

संग्राम काटे एका गवंड्याचा मुलगा ते चित्रपट निर्माता व अभिनेता प्रवास PII

● पंढरपूर ● शनिवार, ८ फेब्रुवारी २०२५
● किंमत ₹ ४ ● पाने : ८

# पंढरी संचार

NO PAIDNEWS NEWSPAPER
pandharisanchar.com
RNI-MAH-MAR/1499/2000
● वर्ष २९ ● अंक - २५९



स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीचा 'अविष्कार-२०२४' मध्ये यशस्वी सहभाग PIII

# पाच लाख भाविक दाखल

## अनेक दिंड्या मुक्कामी; टाळ मृदंगाच्या नादाने दुमदुमली पंढरी !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** माघी एकादशी सोहळा आज शनिवारी होणार आहे. या निमित्य विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी पंढरपुरात पाच लाखाहून अधिक भाविक दाखल झाले आहेत. हरिनामाच्या गजराने पंढरी नगरी दुमदुमून गेली आहे. माघी यात्रेसाठी गेल्या तीन दिवसापासून पंढरपुरात भाविक दाखल होऊ लागले आहेत. भाविकांच्या सोयीसाठी राज्य परिवहन महामंडळाने ४०० जादा एसटी बसेस सोडल्या आहेत. तर रेल्वेने जादा फेऱ्या सुरू केल्या आहेत. तसेच खाजगी वाहनाने भाविक येत आहेत. यामुळे पंढरीत भाविकांची गर्दी वाढू लागली आहे. पंढरीत आलेले भाविक विठ्ठलाचे दर्शन घेतात. यामुळे मंदिर समितीने विठ्ठलाचे मुखदर्शन व पददर्शन अशा दोन वेगवेगळ्या दर्शना रांगा सुरू केल्या आहेत. पद दर्शनासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी असते. यामुळे मंदिर समितीने गोपाळपूर रोडवरील रिद्धी सिद्धी गणपती मंदिराजवळ दहा जादा दर्शन मंडप उभा केले आहेत. या ठिकाणी भाविकांना पिण्याचे पाणी, चहा, नाष्टा, भोजन याची सुविधा केली आहे. दर्शन रांगेत घुसखोरी होऊ नये म्हणून पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. मंदिर परिसरात भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी असते. म्हणून सीसीटीव्ही कॅमेऱ्याची करडी नजर ठेवण्यात आली आहे. यात्रेमध्ये कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला आहे. यात्रा कालावधीत वाहने शहरात येऊ नयेत म्हणून वाहतूक पोलीस नियुक्त करण्यात आले आहे . माघी यात्रेसाठी » पान ३ वर



# अभंगवाणीमुळे भाविक मंत्रमुग्ध

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** माघी यात्रेसाठी पंढरपुरात पाच लाखाहून अधिक भाविक दाखल झाले आहेत. हरिनामाच्या गजराने पंढरी नगरी दुमदुमून गेली आहे. मंदिर समितीकडून शहरातील प्रदक्षिणा मार्गावर ध्वनीवर्धकावरून अभंग वाणी प्रसारित केली जात आहे. अभंगवाणी ऐकून भाविक मंत्रमुग्ध झाले आहेत.

माघी यात्रेत विठ्ठलाच्या दर्शनासाठी पाच लाखाहून अधिक भाविक दाखल झाले आहेत. यात्रेमध्ये भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून प्रशासनाने सर्वतोपरी तयारी केली आहे.दर्शन रांगेतील भाविकांना उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून मंदिर समितीने दहा तात्पुरते दर्शन मंडप उभा केले आहेत. दशमी दिवशी दर्शन रांगेत सुमारे एक लाखाहून अधिक भाविक उभे राहिले होते. दर्शन रांगेतील भाविकांना मंदिर समितीकडून पिण्याचे पाणी, चहा, नाष्टा, भोजन याची सोय करण्यात आली आहे. यामुळे भाविकातून समाधान व्यक्त होत आहे.

पंढरपुरात आल्यानंतर भाविक विठ्ठलाच्या गजराबरोबर संतांचा गजर करतात. यामुळे पंढरपुरात संतांची अभंगवाणी भाविकांना ऐकावयास मिळावी म्हणून मंदिर समिती वतीने प्रदक्षिणा मार्गावर अनेक ठिकाणी ध्वनीवर्धक लावण्यात आले आहेत. यावरून संतांचे अभंग प्रसारित करण्यात येत आहेत. अभंगवाणी ऐकून भाविक मंत्रमुग्ध होत आहेत. मंदिर समितीने चांगला उपक्रम सुरू केल्याबद्दल भाविकातून समाधान व्यक्त होत आहे.

## » At a Glance

### आर्थिक व्यवहारातून प्राशन केले फिनाईल



**मोहोळ :** आर्थिक व्यवहारातून आलेल्या मानसिक तणावात गणेश शरद निंबाळकर (वय ४०, रा. मोहोळ) फरशीवर पडण्याचे प्रयत्न केले. त्रास होऊ लागल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालयातून पुढील उपचारासाठी बहीण पूजा जंगम यांनी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. या घटनेची नोंद सोलापूर सिव्हिल पोलीस चौकी येथे करण्यात आलेली आहे.

### विशेष रेल्वे सेवा पुन्हा सुरू करण्यासाठी हालचाली



**सोलापूर :** करोना महामारी तथा टाळेबंदी काळात संपूर्ण देशातील ठप्प झालेली अर्थव्यवस्था पूर्वपदावर आणण्याच्या दृष्टीने विशेषतः शेतकऱ्यांचा शेतीमाल लांब पल्ल्याच्या बाजारपेठांपर्यंत पोहोचविण्यासाठी सुरू केलेल्या किसान रेल्वेला शेतकऱ्यांकडून मोठा प्रतिसाद मिळाला होता. परंतु नंतर कोणतेही कारण न देता बंद झालेली ही किसान रेल्वे आता पुन्हा सुरू होण्यासाठी मध्य रेल्वे सोलापूर विभागाकडून पाठपुरावा करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने रेल्वे प्रशासनाकडून हालचाली होत आहेत.

### शिवसेना जिल्हा उपप्रमुख कटारे यांचा राजीनामा



**सोलापूर :** शिवसेना (उबाठा) गटाचे जिल्हा उपप्रमुख सुनील कटारे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. सुनील कटारे हे शिवसेना स्थापनेपासूनच शिवसेनेत कार्यरत होते. माजी नगरसेवक, शिक्षण मंडळ सदस्य, व्यापारी महासंघाचे उपाध्यक्ष शिव-बसव जयंती आणि वीर सावरकर मंडळाचे अध्यक्ष अशा विविध पदांवर त्यांनी काम केले आहे. विविध सामाजिक प्रश्नावर त्यांनी जनआंदोलने केली होती. मात्र तालुक्यात राजकीय वर्तुळात या राजीनाम्याबाबत तर्कवितर्क लढविले जात आहेत.


# राज ठाकरे यांच्या शुभहस्ते हॉटेल ग्रँड रेसिडेन्सीचा शुभारंभ

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर सारख्या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणापासून काही अंतरावर वारकरी,भाविक भक्त,पर्यटकाच्या सोईच्या उद्देशाने व सेवेसाठी पंचताराकीत च्या धर्तीवर हे होटल ग्रँड रेसिडेन्सी व हॉटेल श्रेयस या दोन्हीच्या माध्यमातून पर्यटकांना व वारकरी भावी भक्तांना राहण्याची व जेवण्याची उत्तम प्रकारची सोय दिलीप बापू धोत्रे यांनी करून दिल्यामुळे पर्यटकांची सोय झालेली आहे. असे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज हॉटेल ग्रँड रेसिडेन्सी च्या उद्घाटनाप्रसंगी त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या हॉटेल ग्रँड रेसिडेन्सीच्या उद्घाटनाप्रसंगी



उपस्थित मान्यवर म्हणून असंख्य राजकीय नेतेमंडळी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. शिवसेनेचे नेते प्राध्यापक शिवाजीराव सावंत, माढा तालुक्याचे आमदार अभिजित आबा पाटील, पंढरपूर नगरपरिषद चे उपनगराध्यक्ष नागेश काका भोसले, सरकार शिरोमणी सहकारी साखर कारखान्याची चेअरमन कल्याणराव काळे, नगरसेवक नाना कदम, आणि असंख्य मनसे कार्यकर्ते उपस्थित होते.




### बल्करची धडक; दोघे जखमी

**सोलापूर :** सोलापूर ते अक्कलकोट रोडवरील स्वामी समर्थ सूत मिलजवळ बल्करच्या धडकेत चारचाकी वाहनातील दोघे जखमी झाले. हे जखमी कर्नाटकातील आहेत. श्रावणकुमार नारायण गायकवाड (वय ३८, रा. अफजलपूर, जि. कलबुर्गी, कर्नाटक) आणि शांतप्पा (वय ८२, रा. अफजलपूर) अशी जखमींची नावे आहेत. ५ फेब्रुवारी रोजी रात्री श्रावणकुमार व शांतप्पा हे दोघे चारचाकी वाहनातून जात होते.

# दिल्ली विधानसभा आज निकाल जाहीर होणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली:** दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या दिवशी १९ मतमोजणी केंद्रांसाठी निमलष्करी दलाच्या दोन कंपन्यांसह दिल्ली पोलिस कर्मचाऱ्यांची त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. आम्ही मतमोजणीच्या दिवशी कडक सुरक्षा व्यवस्था केली आहे. मतमोजणी केंद्रांमध्ये फक्त अधिकृत कर्मचाऱ्यांनाच प्रवेश दिला जाईल, जिथे मोबाईल फोन वापरण्यास सक्त मनाई असेल, असे विशेष पोलिस आयुक्त देवेश चंद्र श्रीवास्तव यांनी मतमोजणीच्या दिवसाच्या सुरक्षेबाबत पत्रकार परिषदेत सांगितले. दिल्ली पोलिसांनी सर्व मतमोजणी केंद्रांवर तपासणी यापूर्वीच केली असून, सुरळीत वाहतूक सुनिश्चित करण्यासाठी वाहतूक व्यवस्थापन योजना तयार केली आहे, असेही त्यांनी सांगितले.

### आ. सचिन कल्याणशेट्टी यांचे गंभीर आरोप



**अक्कलकोट :** स्टॅन्ड अप कॉमेडीयन प्रणित मोरे मारहाणप्रकरणी अक्कलकोटचे भाजपचे आमदार सचिन कल्याणशेट्टी आक्रमक झाले आहेत. मोरे यांना मारहाण करणारे हे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे आणि खासदार प्रणिती शिंदे यांचे निकटवर्तीय असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. सोलापूरच्या पोलिस आयुक्तांना भेटून त्यांनी मोरे यांना मारहाण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे मोरे यांच्या मारहाणीवरून सोलापुरात भाजप विरोधात काँग्रेस वाद पेटण्याची चिन्हे आहेत.

# ५ लाख लाडक्या बहिणी अपात्र

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकात गेमचेंजर ठरलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतून पाच लाख महिलांना वगळण्यात आल्याची माहिती राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

मंत्री तटकरे यांनी एक्स वरील पोस्टमध्ये म्हटले आहे की, दिनांक २८ जून २०२४ आणि दिनांक ३ जुलै २०२४ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार अपात्र ठरणाऱ्या महिलांना "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजनेतून वगळण्यात येत आहे. पुढे त्यांनी यापूर्वीच्या लाभार्थी महिलांना लाडकी बहिण योजनेतून वगळल्याचेदेखील स्पष्ट केले आहे. संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थी असलेल्या महिला - २,३०,०००, वय



वर्षे ६५ पेक्षा जास्त असलेल्या महिला - १,१०,०००, कुटुंबातील सदस्यांच्या नावे चारचाकी गाडी असलेल्या, नमोशक्ती योजनेच्या लाभार्थी असलेल्या, स्वेच्छेने योजनेतून नाव मागे घेणाऱ्या - १,६०,००० अशा एकूण ५,००,००० अपात्र महिलांना लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात आले आहे. तसेच इतर सर्व पात्र महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ देण्यासाठी महाराष्ट्र शासन कटिबध्द असल्याचे आदिती तटकरे यांनी एक्सवरील पोस्टवरून सांगितले आहे.

### सहा महिन्यांत ६ ग्रामसेवकांवर कारवाई, एकाचे निलंबन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**माढा :** माढा तालुक्यात सहा ग्रामसेवकांवर सहा महिन्यांत गटविकास अधिकाऱ्यांकडून कारवाई करण्यात आली आहे. एकाचे तर थेट निलंबन करण्यात आले असून, इतरांचे कारवाई प्रस्ताव तयार ठेवल्याचे सांगण्यात आले. गटविकास अधिकारी महेश सुळे यांनी गेल्या सहा महिन्यांत शिंदेवाडीचे ग्रामसेवक एस. डी. गायकवाड यांना कामकाजात अनियमितता असल्याचे दाखवून थेट निलंबित केले आहे. याबाबत सीईओंकडे सुनावणी सुरू आहे. तर उपळाई (बु) चे ग्रामसेवक सुधाकर मासाळ यांनी शासनाची दोन गुंठे जागा व्यक्तीला विकल्याचे निदर्शनास आल्यानंतर कारवाई प्रस्तावित आहे.

# उजनीच्या उजव्या कालव्याला पंधरा महिन्यात दुसऱ्यांदा भगदाड

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर जिल्हाला वरदायनी ठरलेल्या उजनी धरणावरील उजव्या कालव्याला 15 महिन्यात दुसऱ्यांदा संगम या ठिकाणी भगदाड पडलं आहे यामुळे कोट्यावधी लिटर पाणी वाया जात आहे .सध्या रब्बी पिकांसाठी पाणी सोडण्यास आधीच उशीर झाला होता आणी आता त्यातच उजनी उजव्या कालव्याची रबर तुटल्याने दुष्काळात तेरावा महिना अशी वेळ शेतकऱ्यांन वरती आली आहे. त्यामुळे रब्बी पिकांचे आवर्तन लांबून शेतकऱ्यांचे आतोनात नुकसान होऊ शकते . त्यामुळे लवकरात लवर उजनी उजव्या कालव्याच्या कॅनला रबर तात्काळ बसवून पाण्याचे आवर्तन लवकरात लवकर चालू करावे अशी मागणी युवा सेना जिल्हा प्रमुख गणेश इंगळे यांनी केली आहे

उजनी उजव्या कालव्याची रबर पंधरा महिन्यात कशी तुटली हे काम निकृष्ठ दर्जाचे करून याचा मलिदा कोण खातंय याची चौकशी करून मलिदा ग्यांग वरती तात्काळ कारवाई करण्यात यावी. ती रबर कोणत्या कंपनी कडून घेतली ती किती निकृष्ट



दर्जाची होती याची ही सखोल चौकशी वरिष्ट पातळीवरती तात्काळ करण्यात यावी अशी मागणी युवा सेना जिल्हा प्रमुख गणेश इंगळे यांनी केली आहे.

# माघी यात्रेनिमित्त अनेक दिंड्या मुक्कामी

## ६५ एकरामध्ये ४ लाख भाविक; नायब तहसीलदार जाधव यांची माहिती

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** माघी यात्रेसाठी दिंडी घेऊन येणाऱ्या भाविकांची सोय प्रशासनाने 65 एकर परिसरात केली आहे. या ठिकाणी 214 दिंड्या आल्या असून 4 लाख भाविक आहेत. भाविकांच्या सोयीसाठी प्रशासनाने 24 तास पिण्याचे पाणी, वीज, आरोग्य सुविधा दिली असल्याची माहिती नायब तहसीलदार विजय जाधव यांनी दिली .माघी एकादशी सोहळा उद्या शनिवारी साजरा होणार आहे. यासाठी विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी विविध गावातून पंढरपुरात पाच लाखाहून अधिक भाविक दाखल झाले आहेत. दिंडी घेऊन येणाऱ्या भाविकांसाठी प्रशासनाने 65 एकर येथे सोय केली आहे. या ठिकाणी 500 प्लॉट पाडण्यात आले असून यातील 450 प्लॉट दिंड्यांना देण्यात आले आहेत. या ठिकाणी 214 दिंड्यांनी निवास केला असून चार लाख





भाविक 65 एकर येथे निवासासाठी आहेत. या ठिकाणी भाविकांच्या सोयीसाठी 1500 स्वच्छालय उभारण्यात आले आहेत. भाविकांना पिण्याचे पाणी मिळावे म्हणून 24 तास पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. तसेच वीज आरोग्य याची सुविधा करण्यात आली आहे. 65 एकर परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगोटे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सोयी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. यामुळे भाविकातून समाधान व्यक्त होत आहे.

पंढरी संचार

### विवाहितेचा विनयभंग; एकाविरुद्ध गुन्हा


■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**बार्शी :** पीडित विवाहित महिला घरासमोरील पोर्चमध्ये झाडू मारत असताना त्यांच्या घरासमोरून जाणाऱ्या एकाने रस्त्यावरून मोटारसायकल थांबवून पीडित महिलेकडे पाहून हाताने मला फोन कर असा इशारा करून मानेने खुणावून मनास लज्जा वाटेल असे कृत्य केल्याची घटना घडली. बार्शी तालुका पोलिसांत एका विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीवरून आरोपी शिवम सिद्धेश्वर काशिद याच्याविरुद्ध बार्शी पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

# 'जीबीएस' बाधित रुग्णाचा मृत्यु

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** गुलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस) बाधित आणखी एका रुग्णाचा उपचारादरम्यान मृत्यु झाला. त्यामुळे मृतांची संख्या सहा झाली आहे. गेल्या २४ तासात नव्याने जीबीएस बाधित तीन रुग्ण सापडले. त्यामुळे शहरासह जिल्ह्यातील बाधित रुग्णसंख्या १७३ वर पोहोचली आहे. मागील पंधरा दिवसांपासून पुणे शहर, पिंपरी-चिंचवड आणि ग्रामीण भागात दूषित पाणी आणि अन्न सेवनामुळे उलट्या, जुलाब, पोटदुखीच्या समस्यांमुळे जीबीएस रुग्णसंख्या वाढली. मात्र, मागील तीन दिवसांपासून रुग्णसंख्या कमी होत असून, गुरूवारी दहा रुग्ण बरे होऊन घरी गेले. तर आत्तापर्यंत ७२ रुग्ण बरे झाले आहेत. जीबीएस रुग्णांची सर्वाधिक संख्या धायरी, नांदेडगाव, सिंहगडरस्ता, किरकटवाडी, खडकवासला या भागात आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहर परिसरातही रुग्ण सापडले आहेत.

पुणे शहर आणि जिल्ह्यात १७० संशयीत जीबीएस बाधित रुग्णांपैकी १४० रुग्णांना जीबीएस झाल्याचे निदान निश्चित झाले आहे. बाधितांमध्ये ३४ रुग्ण पुणे महापालिका कार्यक्षेत्रातील असून, सर्वाधिक » पान ३ वर

**सोलापूर :** दहावी-बारावीची परीक्षा कॉपीमुक्त व्हावी, यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने राज्यातील संवेदनशील परीक्षा केंद्रांवरील हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी ड्रोन कॅमेरे लावण्याचा निर्णय घेतला आहे. पण, त्याची जबाबदारी जिल्हा प्रशासनावर असणार आहे. याशिवाय परीक्षा केंद्रांबाहेरील हालचालींचे देखील व्हिडिओ चित्रीकरण केले जाईल, असेही बोर्डाने स्पष्ट केले आहे.

## ग्रामीण भागात जन्मलेला सामान्य मुलाची भरारी

# संग्राम काटे एका गवंड्याचा मुलगा ते चित्रपट निर्माता व अभिनेता प्रवास

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**सांगोला :** संग्राम काटे हा एका गरीब सर्वसाधारण कुटुंबातला एका मजुरी करणाऱ्या गवंड्याचा मुलगा असून, त्याने एका मराठी चित्रपटाची निर्मिती केली त्या चित्रपटाचं नाव आहे "उगराट" हा चित्रपट अनेक अडचणीतून पार पडलेला आहे.

त्यामध्ये आर्थिक व मानसिक अशा बऱ्याच अडचणीला "संग्राम काटे" याला व त्याच्या संपूर्ण टीमला सामोर जावं लागलं हा चित्रपट करत असताना बऱ्याच वेळा खूप साऱ्या अडचणी आल्या . संग्रामला लहानपणापासूनच कलाक्षेत्रामध्ये काम करण्याचे खूप आवड होती आणि ती आवड आपल्या परिस्थितीमुळे त्याला जोपासता येत नव्हती.

त्यामुळे त्याने काम करत करत आपली कला जोपासायच ठरवलं आणि त्यासाठी त्याने आपले घर आणि आपले गाव सोडून मुंबईला जाण्याचा निर्णय घेतला आणि मुंबईमध्ये जाऊन त्याने मिळेल ते काम करून व ज्या ठिकाणी जागा मिळेल त्या ठिकाणी झोपला आपली कला जोपासायला सुरुवात केली सात ते आठ वर्ष मुंबईमध्ये काढल्यानंतर त्यांनी शेवटी गावी जाऊन चित्रपट निर्मिती करायची असं ठरवलं पण त्यासाठी लागणारा होता तो खूप मोठा पैसा आणि तो पैसा आणायचा कुठून ही खूप मोठी अडचण संग्रामच्या पुढे होती पण मजुरी करणाऱ्या वडिलांची परिस्थिती खूप गरीबीची व झालाकीची होती. पण संग्रामची जिद्द पाहून त्याच्या वडिलांनी "भीमराव काटे "यांनी त्यांच्या पूर्वजांची अर्धा एकर जमीन होती तीही संग्रामच्या स्वप्नांसाठी विकून व घरातील जे पण सेविंग होते ते सर्व पणाला लावून घरातील सोने नाणे जे होते ते सर्व विकून संग्रामच्या स्वप्नांसाठी लावले . आणि त्यातून "उगराट" या चित्रपटाची निर्मिती झाली.

उगराट या चित्रपटामध्ये संग्रामने गावाकडचे कलाकार मुंबई सारख्या सिटीमध्ये जाऊन ऑडिशन देऊन मरमर करून ही त्यांना का मिळत नाही अशा कलाकारांना सोबत घेऊन एक नवीन टीम बनवली व अशा दमदार टीम सोबत "उगराट" चित्रपटाची निर्मिती झाली. पण चित्रपटाच्या शेवटच्या क्षणाला घरातले सर्व पैसे व विकता येणाऱ्या अशा सर्व वस्तू विकून पण चित्रपटाला पैशाची कमी भासत होती अशावेळी को, जुनोनी, तिपेहाळी या भागातील लोकांनी संग्रामला लोकवर्गणी काढून या चित्रपटासाठी पैसे दिले व हा चित्रपट पूर्ण करण्यास मदत केली आणि येत्या 9 फेब्रुवारी 2025 रोजी या "एस के फिल्म प्रोडक्शन प्रस्तुत "उगराट " चित्रपटाचा पहिला टीचर व पोस्टर प्रदर्शन सोहळा सांगोला या ठिकाणी पार पडणार आहे.

त्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून वेगवेगळ्या क्षेत्रातून बरेच लोक या चित्रपटाला व या चित्रपटाच्या पहिल्या टीजर आणि पोस्टरला भरभरून शुभेच्छा देत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व प्रेक्षकांना एक विनंती आहे की एका सर्वसामान्य मुलाने व त्याच्या टीमने बनवलेला हा "उगराट" नावाचा चित्रपट पहावा.

## प्रधानमंत्री शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्याचे आयोजन




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विजापूर रोड, सोलापूर येथे दि. 10 फेब्रुवारी 2025 रोजी सकाळी 10 वाजता आय. टी. आय. उत्तीर्ण, 12 वी उत्तीर्ण, डिप्लोमा व पदवीधर उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांसाठी प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व आस्थापना व पात्र प्रशिक्षणार्थी यांनी मेळाव्यास उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार एस. आर. भालचिम यांनी केले आहे.

» Selected

## राष्ट्रवादी काँग्रेसची महिला कार्यकारिणी जाहीर

**सोलापूर :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची सोलापूर शहर महिला आघाडीची कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यावेळी शहरातील तीन्ही विधानसभा अध्यक्षांसह विविध पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या. सोलापूर महिला पक्ष निरीक्षक दिपाली पांढरे यांच्या सूचनेनुसार सोलापूर शहर महिला अध्यक्ष संगीता जोगदनकर, कार्याध्यक्ष चित्रा कदम यांनी ही पदाधिकारी निवड प्रक्रिया पार पडली. यावेळी दिपाली पांढरे यांच्या हस्ते नूतन महिला पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी नूतन महिला पदाधिकाऱ्यांना दिपाली पांढरे यांनी मार्गदर्शन केले.

## शिक्षण विभागातील लिपीक लाच घेताना सापडला



**सोलापूर :** सोलापूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागातील वरिष्ठ लिपिक 20 हजारांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकला. घनश्याम अंकुश मस्के (वय 43 रा. मरगु अपार्टमेंट, अक्कलकोट रोड, सोलापूर) असे त्याचे नाव आहे. गुरुवारी सायंकाळी 4 वा. ही कारवाई झाली. मस्के यांनी वेतनश्रेणीच्या फाईलवर शिक्षणाधिकाऱ्यांची सही घेण्यासाठी तक्रारदार शिक्षकाकडे 32 हजारांची लाच मागितली होती. त्यातील पहिला हप्ता 20 हजार रुपये स्वीकारताना तो रंगेहाथ सापडला. सदर बझार पोलिसात त्याच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

## ओबीसी महामंडळाची थकीत व्याज दरात सवलत योजना



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** ओबीसी महामंडळाच्या थकित कर्ज प्रकरणात संपूर्ण थकित कर्ज रक्कमेचा एक रकमी भरणा करणाऱ्या लाभार्थ्यास थकित व्याज रक्कमेत (५०% सुट) सवलत देण्याबाबतची एकरक्कमी परतावा (OTS) योजना दि. ३१ मार्च २०२५ पर्यंत राबविण्यात येत आहे त्यानुसार, महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थ्यांनी योजनेचा फायदा घेऊन कर्ज मुक्त व्हावे, असे आवाहन सोलापूर जिल्हा व्यवस्थापक व्ही. डी. लहारे यांनी केले आहे.

## दिव्यांगांसाठी महामंडळाची 'शॉप ऑन ई- व्हेईकल योजना'

### दि. 10 फेब्रुवारी पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबनासाठी हरित उर्जेवर चालणारे पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावरील दुकान (मोबाईल शॉप ऑन ई-व्हेईकल) मोफत उपलब्ध करून देण्यात येत आहे. ही योजना दिव्यांग वित्त व विकास महामंडळातर्फे राबविण्यात येत आहे. या योजनेसाठी दिव्यांग व्यक्तींनी ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी दि. 10 फेब्रुवारी 2025 दुपारी 12.00 वाजेपर्यंत मुदत देण्यात आली आहे. अशी माहिती दिव्यांग वित्त विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी दिली आहे.

दिव्यांग व्यक्तींना पुरेशा सोयी- सुविधा उपलब्ध करून रोजगारनिर्मितीस चालना देणे. दिव्यांग व्यक्तींचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे, सर्वसामान्य व्यक्तींप्रमाणे दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या परिवार, कुटुंबासमवेत जीवन जगण्यास सक्षम करणे, हा या योजनेचा उद्देश आहे.

गरजू दिव्यांग व्यक्तींना लाभ मिळण्यासाठी अर्जदार नाव नोंदणी व अर्ज करण्यासाठी पोर्टल सुरू करण्यात आले आहे. दिव्यांग व्यक्तींना https://register.mshfdc.co.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करता येईल. या लिंकद्वारे दिव्यांग व्यक्तींना ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन दिव्यांग वित्त विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

## सुसज्ज क्रीडा संकुल

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**माढा :** क्रिडा मंत्री दत्तामामा भरणे यांची आमदार अभिजीत पाटील यांनी मुंबईत भेट घेऊन माढा शहरात होणार अत्याधुनिक व सुसज्ज क्रीडा संकुलाचे निवेदन दिले. माढा येथे आधुनिक क्रीडा संकुल उभारणीसाठी महाराष्ट्र शासनाने रू. ३. ००कोटींचा निधी मंजूर केला आहे. महाराष्ट्र विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात यासंदर्भात विषय उपस्थित करून उत्तम सुविधा असलेले क्रीडा संकुल निर्माण करण्याची मागणी करण्यात आली होती.

## सोलापुरात आयटी क्षेत्राच्या वाढीसाठी सकारात्मक चर्चा



**सोलापूर :** सोलापूरमध्ये आयटी क्षेत्राच्या वाढीसाठी विशेष बैठक ग्रे नाईट सर्व्हिसेस नेहरू नगर येथे आयोजित करण्यात आली होती. सोलापूरमधील आय. टी उद्योजकांच्या या बैठकीत आय टी उद्योगातील समस्या आणि आव्हान यावर सखोल चर्चा झाली. सोलापूरच्या विकासासाठी ठोस पावले उचलली जातील असा विश्वास सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुभाष देशमुख यांनी व्यक्त केला. यावेळी खा. प्रणिती शिंदे, भाजपा शहर अध्यक्ष नरेंद्र काळे, माऊली झांबरे, आयटी उद्योजक व सोलापूर विकास मंचचे सदस्य उपस्थित होते.

## व्यापारी वाचनालय मोहोळ येथे 'समूह वाचन व हळदी कुंकू' कार्यक्रम संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मोहोळ :** व्यापारी मोफत वाचनालय मोहोळच्या वतीने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या अंतर्गत 'समूह वाचन व हळदी कुंकू' कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमांमध्ये वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. सुधीर जोशी यांनी वाचनालयाचे महत्त्व महिलांच्या आरोग्या संबंधी माहिती देऊन वाचनालयाच्या महिला व बाल विभागात होणाऱ्या कार्यक्रमाची माहिती दिली. प्रारंभी राजमाता जिजाऊच्या प्रतिमेस रजनी गायकवाड व उपस्थित महिला मान्यवरांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यावेळी डॉ. रेश्मा कुर्डे, जोत्सना जोशी, डॉ. स्नेहलता वाले, लक्ष्मी तावसकर, सीमा पाटील आदी महिला मान्यवर उपस्थित होत्या.

याप्रसंगी मोहोळच्या कवियत्री विजया देशपांडे यांनी आपल्या कवितेचे वाचन केले तर राजन घाडगे यांनी 'आई ' या विषयावर गीत सादर केले. सर्व महिलांनी सामूहिक वाचन करुन परिक्षण केले व ग्रंथ प्रदर्शनाचा लाभ घेतला. अंगणवाडी सेविका रजनी गायकवाड यांना सावित्रीबाई फुले व जिजामाता समाजभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल वाचनालयाच्या वतीने त्यांचाही सत्कार करण्यात आला व सर्व महिलांना हळदी कुंकु देऊन ग्रंथ भेट व तिळगुळाची वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे निवेदन सहाय्यक ग्रंथपाल पूनम शिंदे यांनी तर सेवक शहाजहान बागवान यानी मानले.

या कार्यक्रमास प्रीती घाडगे, नंदा देशपांडे, अलकनंदा कुलकर्णी, सुवर्णा शिंदे, एस. एम. देशमुख, सुनंदा भिवरे, सावित्री केवळे, जानकी कुलकर्णी, वसुधा देशपांडे, मीना पाटील, अंजली शिंदे उज्वला क्षीरसागर, आदीसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## सांगोल्याजवळ वाहनांची धडक बसुन दोन ऊसतोड मजुरांचा मृत्यू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**सोलापूर :** सांगोला मिरज रस्त्यावर, सांगोल्याजवळ मालवाहतूक करणाऱ्या दोन वाहनांची सामोरा समोर धडक बसून झालेल्या अपघातात दोन ऊसतोड मजुरांचा मृत्यू झाला. तर अन्य नऊजण जखमी झाले. फिक्कट गाडीतून डाळिंबाची वाहतूक केली जात होती. तर टेम्पोत ऊसतोड मजूर होते. सर्व मृत आणि जखमी सांगोला तालुक्यातील गौडवाडीतील राहणारे आहेत.

बाबुराव महादेव गोडसे (वय ४२) आणि एकनाथ सोपान गडदे (वय ५३) अशी या अपघातातील मृतांची नावे आहेत. जखमी मध्ये विमल भारत कांबळे (वय ५५), रेश्मा संजय ऐवळे (वय ३०), सुजाता बापू आलदर (वय ३५), दामू राजाराम शिंगाडे (वय ६०), गोरख लिंगू सरगर, मोईनुद्दीन गुलाब मुलाणी (वय ७०) गणपत दत्तू आलदर (वय ५०), भारत विष्णू कांबळे (वय ६५) आणि हर्षद हणमंतु काटे (वय १८) यांचा समावेश आहे.

सांगोला तालुक्यातील कडलास येथील शेतकऱ्यांचा ऊस तोड करून जमेची १० के ६७५३) या टेम्पोमधून मिरज रस्त्यावर गौडवाडीकडे आपल्या गावी परत निघाले होते. तर एखतपूर येथून डाळिंब भरून एमएच ४५ एएफ ६७८५) पिकअप गाडी सांगोल्याच्या दिशेने निघाली होती. दोन्ही वाहनांची समोरासमोर धडक होऊन हा अपघात झाला. सांगोला पोलीस ठाण्यात या अपघाताची नोंद झाली आहे.

## रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर कारवाई



**करमाळा :** करमाळा शहरातील मुख्य बाजारपेठेत व बस स्टँड परिसरात पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी स्टाफसोबत पायी पेट्रोलिंग केले पेट्रोलिंग दरम्यान रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर तसेच वाहनांवर तसेच विना नंबर प्लेट, फॅन्सी नंबर प्लेट वाहनांवरती कारवाई करण्यात आली. बाजारपेठेतील दुकानासमोर सीसीटीव्ही बसविण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.




## अकलूज येथील भक्ती कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूटचे

# जीसीसी-टीबीसी परीक्षेत घवघवीत यश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अकलूज :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांचे वतीने डिसेंबर २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय जीसीसी-टीबीसी (कॉम्प्युटर टायपिंग स्पीड) परीक्षेचा निकाल नुकताच ऑनलाईन जाहीर झाला. या परीक्षेमध्ये भक्ती कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट, अकलूज या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी यशाची उज्वल परंपरा कायम ठेवत दैदिप्यमान यश प्राप्त केले. संस्थेतील कु. बनसोडे क्षितिजा कुबेर हिने कॉम्प्युटर टायपिंग परीक्षा जीसीसी-टीबीसी इंग्रजी ३० श.प्र.मि. या विषयात ९६% गुण प्राप्त करत माळशिरस तालुक्यामध्ये प्रथम येण्याचा बहुमान मिळविला, तर याच विषयात साळुंखे सुरज राजेंद्र याने ९४.५ गुण प्राप्त करत द्वितीय क्रमांकाचा आणि वळकुंडे काजल मोहन हिने इंग्रजी ३० व मराठी ३० या विषयात ९३.५% गुण प्राप्त करत तालुक्यात तृतीय क्रमांकाचा बहुमान प्राप्त केला. जीसीसी-टीबीसी डिसेंबर २०२४ परीक्षेत विषयानुसार संस्थेमध्ये प्रथम तीन क्रमांक मिळवलेले विद्यार्थी पुढील



बनसोडे क्षितिजा कुबेर साळुंखे सुरज राजेंद्र वळकुंडे काजल मोहन

प्रमाणे :- इंग्रजी ३० श.प्र.मि. या विषयात :- बनसोडे क्षितिजा कुबेर ९६% प्रथम, साळुंखे सुरज राजेंद्र ९४.५% द्वितीय, वळकुंडे काजल मोहन ९३.५% तृतीय. इंग्रजी ४० श.प्र.मि. या विषयात :- कु.वळकुंडे काजल मोहन ९०% प्रथम, साळुंखे सुरज राजेंद्र व हाके सुशांत दत्तात्रय ८४.५% द्वितीय, नागरगोजे आर्यन भीमराव ८३% तृतीय. मराठी ३० श.प्र.मि. या विषयात :- वळकुंडे काजल मोहन ९३.५% प्रथम, मुळे कल्याण रमेश ८९% द्वितीय, माने निकिता पांडुरंग ८७% तृतीय, असे गुण प्राप्त करत या सर्वांनी उत्तुंग यश संपादन केले आहे. तर भिताडे अतुल ९२%, आगलावे तेजस व गायकवाड मयुरी ९१.५%, भोसले श्रीराज ९१%, माने निकिता ९०%, दहिवाळ वैष्णवी व मस्के उज्वला यांनी ८९.५% गुण मिळवत संस्थेमधील ५३ विद्यार्थ्यांनी ए प्लस व १४ विद्यार्थ्यांनी ए श्रेणी प्राप्त करत विशेष प्राविण्य संपादन केले. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांचे मार्फत शासकीय, निम-शासकीय विभागातील लिपिक (क्लार्क) पदांच्या भरतीसाठी जीसीसी-टीबीसी मराठी, इंग्रजी व हिंदी ३० व ४० शब्द प्रति मिनिट या विषयांचे कोर्सेस चालविले जात असून वर्षातून दोन वेळेस या परीक्षा घेतल्या जातात व परीक्षा पास झालेले विद्यार्थी सर्व शासकीय, निमशासकीय, महामंडळे आदी विभागातील लिपिक पदांच्या भरतीसाठी पात्र ठरतात. डिसेंबर २०२४ मधील जीसीसी-टीबीसी (कॉम्प्युटर टायपिंग) परीक्षेत उज्वल यश प्राप्त केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना संस्थेचे प्राचार्य गजानन जवंजाळ सर, नितीन दुरणे सर, किरण भगत सर, ज्ञानदीप जवंजाळ सर यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. उत्तुंग यश प्राप्त करत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक होत असून संस्थेच्या वतीने प्राचार्य गजानन जवंजाळ सर यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

पंढरी संचार

**सोलापूर :** माघ वारीनिमित वाढीव एसटी गाड्यांच्या प्रतीक्षेत असलेल्या भाविकांना अखेर दिलासा मिळाला आहे. यंदाच्या माघवारीसाठी राज्य परिवहन महामंडळने जादा बस चालवण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्यावर्षी वारीसाठी अनेक भाविकांनी गर्दी केली होती. त्यामुळे बस कमी पडल्यामुळे आलेल्या भाविकांचे मोठ्या प्रमाणात हाल झाले होते. मागच्या वर्षी झालेली गर्दी लक्षात घेता यंदा प्रवासी मागणी वाढल्याने 110 गाड्यांची संख्या वाढवण्यात आली आहे, अशी माहिती एसटी महामंडळाने दिली.

### मेडिसिन आणि फार्मसी गटात मिळविला दुसरा क्रमांक

## स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीचा 'अविष्कार-२०२४' मध्ये यशस्वी सहभाग

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ फार्मसीने पुन्हा एकदा संशोधन आणि नवोपक्रमाच्या क्षेत्रात यशाची नवी उदाहरणे सादर केली आहेत.

विद्यापीठ स्तरीय अविष्कार स्पर्धेत स्वेरीच्या एका प्रकल्पाची निवड राज्यस्तरीय 'अविष्कार २०२४' साठी झाली आहे. या यशाबद्दल स्वेरीतील संशोधकांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. 'स्वेरी' हे संशोधन आणि नवोपक्रमशील संस्कृतीचे प्रतीक आहे, हे आता सर्वश्रुत झाले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत विद्यापीठ स्तरीय 'अविष्कार २०२४' ही संशोधन स्पर्धा सोलापूर मधील वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये आयोजित केली होती. या स्पर्धेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या ३०हून अधिक महाविद्यालयातील ४१४ संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे संयोजन डॉ. रश्मी दीक्षित आणि डॉ. सतीश काशीद यांनी केले होते. ही स्पर्धा विद्यार्थ्यांना त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पना सादर करण्यासाठी एक उत्कृष्ट व्यासपीठ प्रदान करणारी ठरली. यामध्ये स्वेरीच्या एका प्रकल्पाने उल्लेखनीय कामगिरी केली. स्वेरी फार्मसी विभागात बी. फार्मसीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या अर्चना वसंत कोंगारी यांनी 'मेडिसिन आणि फार्मसी' गटात दुसरा क्रमांक मिळवला. त्यांना फार्मसीचे 'अविष्कार २०२४' चे समन्वयक डॉ. व्ही. व्ही. मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे आणि प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. दामा म्हणाले की, 'अविष्कार मध्ये विजेतपद मिळविलेल्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तयारी करावी आणि त्यात देखील यश खेचून आणावे असे सांगून उपयुक्त मार्गदर्शन केले. सन २००६ साली महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल एस एम. कृष्णा यांच्या पुढाकाराने विद्यापीठस्तरीय 'अविष्कार' ही संशोधनात्मक स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये घेण्यात येते. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक गुणांना चालना देणे, त्यांच्यामधील संशोधनवृत्ती जोपासणे, नाविन्यपूर्ण विचारासाठी प्रोत्साहित करणे आणि संशोधनाच्या गुणवत्तेत सुधारणा घडवणे यासाठी ही स्पर्धा महत्त्वाची ठरली आहे. विद्यापीठ स्तरावरील या स्पर्धेत प्युअर सायन्सेस, कृषी, ह्युमॅनिटीज, इंजिनिअरिंग, फार्मसी अशा विविध श्रेणींमध्ये युजी, पीजी आणि पीपीजी स्तरावरील विद्यार्थी सहभागी झाले होते. स्वेरीच्या फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या नाविन्यपूर्ण संशोधनाचा गौरव सर्व स्तरातून करण्यात येत आहे. विदयार्थ्यांनी अविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये मिळविलेले यश महाविद्यालयातील सशोधन आणि नवकल्पना वाढवण्याच्या कटिबद्धतेचे परिमाण आहे तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्जनशीलतेचा आणि ज्ञानाचा शोध घेण्यासाठी प्रेरणा देणारे आहे, हे मात्र निश्चित. यशस्वी संशोधक विद्यार्थ्यांचे स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ. बी. पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, विश्वस्त व पदाधिकारी, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार, कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व पालक यांनी अर्चना कोंगारी यांचे अभिनदन केले.



**पंढरपूर :** 'अविष्कार-२०२४' मध्ये द्वितीय आलेल्या विद्यार्थिनी अर्चना कोंगारी यांचे स्वागत व सत्कार करताना स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ. बी. पी.रोंगे, सोबत डावीकडून डॉ. व्ही. व्ही. मोरे, अर्चना कोंगारी व प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार.

» पान १ वरुन

### पाच लाख भाविक दाखल

परगावहून दिंडी सोहळे येत असल्यामुळे या सोहळ्यांची सोय ६५ एकर येथे प्रशासनाने केली आहे. या ठिकाणी २०० हून अधिक दिंड्या दाखल झाल्या असून या ठिकाणी चार लाख भाविकांची निवासाची सोय झाली आहे. या ठिकाणी प्रशासनाने भाविकांना २४ तास पिण्याचे पाणी, वीज, आरोग्य, पोलीस बंदोबस्त दिला आहे.यामुळे भाविकातून समाधान व्यक्त होत आहे. विठ्ठलाच्या दर्शनासाठी आलेले भाविक चंद्रभागा नदीमध्ये पवित्र स्नान करतात. यामुळे प्रशासनावतीने चंद्रभागा नदीमध्ये पाणी सोडण्यात आले आहे. यामुळे भाविकांची पवित्र स्नानाची सोय झाली आहे. गेल्या दोन दिवसापासून पंढरपुरात भाविक दाखल होऊ लागल्यामुळे रस्त्यावर भाविकांची गर्दी दिसून येत आहे. हरिनामाच्या गजराने पंढरी नगरी दुमदुमून गेली आहे. पंढरीत आलेले भाविक भजन, कीर्तन, प्रवचन आदी कार्यक्रम करीत आहेत. यामुळे वातावरण भक्तीमय झाले आहे.

### 'जीबीएस' बाधित रुग्णाचा मृत्यु

रुग्णसंख्या (८७) ही समाविष्ट गावातील आहे. २२ रुग्ण पिंपरी-चिंचवड महापालिका, २२ रुग्ण पुणे ग्रामीण तर ८ रुग्ण हे इतर जिल्ह्यातील आहेत. गेल्या २४ तासात जीबीएसने खासगी रुग्णालयातील एका व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यामुळे मृतांची संख्या सहावर पोहचली असून, त्यापैकी एक रुग्ण जीबीएसमुळे, तर अन्य पाच रूग्ण जीबीएस संशयीत मृत्यू झाला असल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले. दाखल रुग्णांपैकी ५५ रूग्ण आयसीयुमध्ये उपचार घेत असून, २१ रूग्ण व्हेंटीलेटरवर आहेत.

» Selected

### सोपल-राऊतांची गट्टी जमली, नवी लाल परी धावली

**बार्शी :** बार्शी बस आगार डेपोत कित्येक वर्षानंतर नव्या बसचे आगमन झाले. या नव्या बसच्या स्वागत व लोकार्पण सोहळ्यासाठी आजी-माजी आमदार एकत्र आल्याचे पाहायला मिळाले. विशेष म्हणजे विधानसभा निवडणुकीत जीवावर उठण्याची टीका करेपर्यंत विरोध करणाऱ्या बार्शीच्या या दोन्ही नेत्यांची चांगलीच गट्टी जमल्याचे पाहायला मिळाले. बार्शीच्या राजकारणात काहीशी मवाळता यानिमित्ताने येईल, असे म्हटले तर वावगं ठरणार नाही. बार्शीच्या ताफ्यात नव्याने दाखल झालेल्या 10 बसेसचे लोकार्पण आमदार दिलीप सोपल व माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी केले.

## पंढरपूर रेल्वे स्टेशनवर प्रवासी दिन साजरा प्रवाशांना तिळगूळ वाटप



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** अखिल भारतीय ग्राहक पंचायतीतर्फे रथसप्तमी हा दिवस राष्ट्रीय प्रवासी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या निमित्त पंढरपूर रेल्वे स्टेशनवर तिळगूळ वाटप समारंभ आयोजित करण्यात आला. अध्यक्षस्थानी स्टेशन प्रबंधक के के मिश्रा होते. प्रारंभी ग्राहक पंचायतीचे आराध्य दैवत स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक तालुका अध्यक्ष विनय उपाध्ये यांनी केले.जिल्हा संघटक दीपक इरकल यांनी प्रवासी दिन साजरा करण्यामागील हेतू स्पष्ट केला. जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी किसान रेल्वे सुरू करावी अशी मागणी केली. स्टेशन प्रबंधक के के मिश्रा यांनी रेल्वेतर्फे सुरू असलेल्या विविध कामाबद्दल सविस्तर माहिती दिली. प्रवासी सेवेतील त्रुटी, अपेक्षित सुधारणा आमच्यापर्यंत पोहोचवा त्या निश्चितपणे सोडविण्यात येतील अशा भावना व्यक्त केल्या. यावेळी ग्राहक पंचायतीचे सदस्य राजु ऐनापुरे,श्री व सौ. रेखा चंद्रराव,तिकीट तपासणीस,स्वच्छता दूत,रेल्वे सुरक्षा बलाचे कर्मचारी, रेल्वे प्रवाशांना तिळगूळ वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी वाणिज्य व्यवस्थापक अमोल जोशी व त्यांच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## गोल रिंगण...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**मोहोळ :** माघवारीनिमित्त सोलापूर तिन्हेमार्गे पंढरपूर पायी चालत जाणाऱ्या दिंडीचे रिंगण भाविक वारकरी मंडळाचे माध्यमातून पेनूर येथे तीन वर्षांपासून सुरू आहे. संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालखीचे प्रमुख उपस्थितीमध्ये पेनूर येथील महात्मा गांधी विद्यालय येथे तिसरे गोल रिंगण सोहळा संपन्न झाला. दीपक नरोटे यांचे अश्व रिंगणसाठी आणले होते. भारत चवरे महाराज, नागनाथ शिंदे महाराज, शत्रुघ्न चवरे यांच्या अश्वपूजन सरपंच सुजित अवारे, उपसरपंच सागर चवरे यांच्या हस्ते पालखी पूजन करण्यात आले.

## जन्मठेप शिक्षेत पॅरोल रजेवर बाहेर येताच झाला फरार



**सोलापूर :** खूनाच्या गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. शिक्षा भोगत असताना पॅरोल रजेवर घरी आला आणि तेथून आरोपी फरार झाला. पोलीस त्याचा शोध घेत असताना या आरोपीला सोलापूर ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी त्याच्या दोन साथीदारासह अटक केली आहे. त्यांच्याकडे असलेले चार देशी बनावटीचे पिस्टल व २४ जिवंत काडतुस हस्तगत करण्यात आली आहेत.

## बिबट्याच्या मृत्युला वनविभाग जबाबदार-पाटील



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर तालुक्यांमध्ये ४ ते ५ बिबट्याचा मुक्त संचार असून शेतकऱ्यांमध्ये भिंतीचे वातावरण निर्माण झाले आहे.गेल्या दोन ते तीन वर्षांपासून पंढरपूर तालुक्यातील भंडीशेगाव, उपरी, पळशी, गादेगाव, ,सुस्ते, चळे, आंबे, सरकोली, पोहोरगाव, ओझेवाडी, पुळुज इत्यादी गावातील जनावरांवर हल्ले केले आहेत.वेळोवेळी सदर हल्ले बिबट्याने केले आहेत,हे प्रत्यक्ष दर्शी शेतकर्यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना सांगितले होते. स्वाभिमानी शेतकरी संघटनेने अनेक वेळा पत्र व्यवहार करून ही वन विभागाचे अधिकाऱ्यांनी तो बिबट्या नसून तो तरस आहे असे सांगून शेतकऱ्यांची वारंवार दिशाभूल केली व शेतकऱ्यांना खोटे ठरवले. परंतु काल झालेल्या अपघातांमधून पंढरपूर तालुक्यात बिबट्या चा संचार आहे हे सिद्ध झाले आहे,वनविभागाचा रामभरोसे कारभार चव्हाट्यावर आला असून,त्यात बिबट्या मयत झाला आहे. याला जबाबदार पंढरपूर येथील संबंधीत वन अधिकरी यांना जबाबदार धरावे. एक बिबट्या मृत्यु झाला तर दोन बिबट्यानी तिथून पळ काढला आहे त्यामुळे शेतात रात्री,अपरात्री काम करणारे शेतकरी,शेत मंजूर, यांचेमध्ये दहशतीचे वातावरण तयार झाले आहे.

ज्या भागात बिबट्या चार वावर आहे त्या भागात वन विभागाच्या वतीने दवंडी, बैठक, गावभेट, घेऊन शेतकऱ्यांना आधार द्यावा व तात्काळ बिबट्यांना जेरबंद करून त्यांच्या अधिवासात सोडावे.अर्वरित बिबट्या कडूनही माणसावर हल्ला होऊ शकतो,त्या अगोदर वनविभागाने खबरदारी घ्यावी .

### पालकमंत्री जयकुमार गोरे जिल्हा दौऱ्यावर



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे हे शुक्रवार दिनांक 14 फेब्रुवारी 2025 रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावरयेणार असल्याची माहिती पालकमंत्री यांच्या कार्यालयाकडून देण्यात आली. यावेळी चिकमहुद तालुका सांगोला, महुद, देगाव कालवा भेट ( चाचणी सिंचन कार्यक्रम) आदी ठिकाणी पालकमंत्री यांचे कार्यक्रम नियोजित आहेत. तसेच या अनुषंगाने संपूर्ण दौरा नियोजन नंतर कळविण्यात येणार आहे, अशी माहिती पालकमंत्री सोलापूर यांच्या कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

## पंढरी सायक्लोथान-2025 सायकल प्रेमी साठी आयोजित- सागर कदम

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** चंद्रभागा नदी संवर्धनासाठी राबवीत असलेला उपक्रम या उपक्रमाच्या माध्यमातून आम्ही पंढरपूरकर फाउंडेशन च्या वतीने सालाबाद प्रमाणे यंदा देखील फेब्रुवारीच्या महिन्यांमधील 16 फेब्रुवारी 2025 रविवार या दिवशी ठीक सकाळी सहा वाजता पंढरपुरातील लहान,थोर सर्व वयोगटातील सायकल प्रेमींना या पंढरी सायकल 2025 या उपक्रमामध्ये सामील होण्याचे आवाहन आम्ही पंढरपूरकर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सागर कदम यांनी केलेले आहे.

पंढरपूर शहरातील सायकल प्रेमी च्या साठी पंढरी सायकल 2025 या स्पर्धेचे आयोजन केलेले आहे.या स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी प्रवेश हा मोफत ठेवलेला आहे.प्रत्येक सायकल प्रेमींनी आपले नाव नोंदणी करून आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन सादर कदम यांनी आज रोजी केले.

या स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकांना अडीच किलोमीटर तसेच सात किलोमीटर अशा अंतराची सायकल स्पर्धा आयोजित केलेली आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या प्रत्येक सदस्याला टी-शर्ट त्याचप्रमाणे गुल्कोजचेपाणी, खाऊ वाटप आणि प्रशस्तीपत्र देण्याचे नियोजन केले आहे. अशी माहिती सागर कदम यांनी आज रोजी दिली.

## माजी सैनिकांच्या विधवांसाठी संघटना स्थापित करावी



**सोलापूर :** सोलापूर जिल्हयातील सर्व माजी सैनिकांच्या विधवा महिलांच्या कल्याणासाठी संघटना स्थापित करणेबाबत सैनिक कल्याण विभागाचे संचालक यांनी सुचना दिलेल्या आहेत. माजी सैनिकांच्या विधवा महिलांसाठी जिल्हा स्तरावरील योग्य व तात्काळ कार्यवाही करुन संघटना स्थापित करावी. माजी सैनिकांच्या विधवांसाठी देण्यात येणाऱ्या उपाययोजना करण्यासाठी दररोज सकाळी ११ ते २ वाजेपर्यंत सैनिकी मुलींचे वसतिगृह, सुंदरमनगर शासकीय आय. टी. आय च्या पाठीमागे विजापूर रोड, सोलापूर येथे माजी सैनिक विधवा महिलांचे मेळाव्याचे अयोजन केले आहे.




### महिलांसाठी आगळा-वेगळा कार्यक्रम

## जिजाऊ ब्रिगेड च्या हळदी-कुंकू समारंभामध्ये ४०० ग्रंथाचे वाटप

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** जिजाऊ ब्रिगेड च्या वतीने हळदीकुंकू आणि तिळगूळ स्नेहमेळाव्याचे आयोजन प्रा मिनाक्षी अमोल जगदाळे पुणे विभागीय अध्यक्ष (सातारा,सोलापूर) यांच्या घरच्या प्रांगणात करण्यात आले होते.

यावेळी चारशे महापुरुष आणि महानायिकांच्या पुस्तकांचे वाटप करण्यात आले . विशेष बाब म्हणजे त्या गेल्या सहा वर्षापासून विधवा महिलांनाही हळदी कुंकवाचा मान देतात. प्रा. जगदाळे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते .

त्यावेळी सौ जगदाळे म्हणाल्या, विधवा असणे हा कांहीं स्त्रियांचा अपराध नाही, समाजात विधवांना सन्मानाची वागणूक मिळाली पाहिजे, कारण विधवांनी देखील इतिहास घडविला आहे. जिजामाता, ताराबाई, अहील्यामाता, सावित्रीबाई, उमाबाई दाभाडे यांनी पतीनिधनानंतर सती न जाता हिंमतीने इतिहास घडविला. विधवा अशुभ नसतात, त्यांचाही आदर, सन्मान झाला पाहिजे, त्यांना मंगल कार्यात सहभागी केले पाहिजे, या उदात्त हेतूने मराठा सेवा संघ प्रणित जिजाऊ ब्रिगेड पुणे विभागाच्या वतीने अकलूज येथे आयोजित कार्यक्रमातत्या बोलत होत्या.त्यामध्ये त्यांनी जिजाऊ ब्रिगेडची प्रागतिक विचारधारा समजावून सांगितली.

प्रथमतः सत्यप्रभादेवी मोहिते पाटील, शितलादेवी मोहिते पाटील, शिवन्यादेवी मोहिते पाटील यांच्या हस्ते जिजाऊ मॉंसाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमात 400 महत्वपूर्ण ग्रंथांचे वाटप करण्यात आले. मान्यवरांनी महिला सक्षमीकरणावर आपले विचार मांडले. "स्त्री ही अबला नसून ती सबला आहे, ती शारीरिक, मानसिक आणि बौद्धिकदृष्ट्या सक्षम आहे, असे सत्यप्रभादेवी रणजितसिंह मोहिते पाटील म्हणाल्या, शीतलदेवी मोहिते पाटील म्हणाल्या महिलांना संधी दिली तर ती देश चालवू शकते, न्यायदान करू शकते, विमान चालवू शकते, विद्यापीठ चालवू शकते, अवकाशात भरारी मारू शकते.

यावेळी देवण्या शिवतेजसिंह मोहिते पाटील म्हणाल्या मुलाप्रमाणे मुलीलाही वंशाचा दिवा मानले पाहिजे" मुलगा मुलगी भेदभाव नको असे विचार सौ.देवण्या शिवतेजसिंह मोहिते पाटील म्हणाल्या.सौ जगदाळे म्हणाल्या, महिला वैचारिक दृष्ट्या सक्षम होण्यासाठी व सर्व महापुरुष व महानायिकांचे कार्य व प्रेरणादायी विचार जनसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी मी प्रयत्नशील आहे, गेल्या सहा वर्षापासून मी ग्रंथरूपी वैचारिक वाण महिलांना वाटत आहे. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन स्नेहल घाडगे यांनी केले, तर आभार करुणा धुमाळ यांनी मानले. या कार्यक्रमाला जिजाऊ ब्रिगेड पदाधिकारी हेमलता मुलीक, आशा सावंत, सुवर्णा क्षीरसागर, चव्हाण, गायकवाड ,संगीता जगदाळे , भावना देशमुख उपस्थित होत्या. यावेळी पाटील, सुवर्णा शेंडगे, खटके, गोवे, डॉक्टर अर्चना गवळी, संध्या सावंत, अर्चना सूर्यवंशी, डॉ अंजली कदम, डॉ खडतरे, डॉ श्रद्धा जवानजाळ , डॉ देवडीकर, डॉ गांधी,डॉ बुरुंगुले, डॉ एकतपुरे, डॉ प्रीती गांधी, प्राध्यापक वृंद तसेच राजकीय, सामाजिक, पत्रकारिता,सांस्कृतिक ,शैक्षणिक विविध क्षेत्रातील मान्यवर आणि प्रचंड संख्येने महिला उपस्थित होत्या.

संपादकीय विशेष

# ‘एक्झिट पोल’चे भाकित

प्रत्येक निवडणुकीत ‘एक्झिट पोल’चे अंदाज चुकले, की त्यांच्या विश्वासार्हतेवर प्रश्न उपस्थित केले जातात. या संस्था मार्केटिंगसाठी सुपारी घेऊन काम करतात, अशी टीकाही केली जाते. विविध वृत्तपत्र आणि माध्यमांशी संबंधित संस्थांचे अंदाजही चुकतात. ते का चुकतात, हे अगोदर जाणून घेतले पाहिजे. ‘एक्झिट पोल’ बनवणाऱ्या संस्थांकडे ‘एक्झिट पोल’चे निष्कर्ष काढण्यासाठी खूप कमी वेळ असतो. त्यांना देशातील प्रत्येक भागातील वेगवेगळ्या समुदायाची आकडेवारी मिळत नाही. त्यामुळे मोजक्या लोकांना प्रश्न विचारुन निष्कर्ष काढले जातात. अमेरिकेतील ब्राऊन विद्यापीठातील प्रो. आशुतोष वार्ष्णेय यांनी एक पोस्ट केली होती. त्यानुसार वेळेची कमतरता हे ‘एक्झिट पोल’ अपयशी ठरण्याचे सर्वात मोठे कारण असल्याचे म्हटले. वेळ नसल्यामुळे एजन्सी लगेच निष्कर्ष जाहीर करण्याच्या गोंधळात चुकीचा डेटा जमा करतात. ‘एक्झिट पोल’च्या नियमानुसार एकूण मतदारापैकी एक टक्का मतदारांची पाहणी करावी लागते. त्यात लिंग आणि जातीकडे लक्ष ठेवले पाहिजे; परंतु त्या नियमाचे पालन सर्व्हे करणाऱ्या संस्था करत नाही. त्यामुळे ‘एक्झिट पोल’ चे अंदाज चुकतात. एखाद्या मतदार संघात दोन लाख मतदार असतील, तर त्या ठिकाणी दोन हजार लोकांना त्यांचे मत विचारणे गरजेचे आहे; परंतु भारतासारख्या खंडप्राय देशात तसे होत नाही. देशातील ५४३ लोकसभा मतदार संघात हे शक्य होत नाही. लहान निवडणुकीत हे शक्य आहे. मतदान केल्यानंतर अनेक मतदार सर्व्हे करणाऱ्या एजन्सीला माहिती देण्यास इच्छूक नसतात. तसेच काही जणांनी माहिती दिली तरी, ते ती माहिती खरीच देणार का? याबाबत शंभर टक्के खात्री नसते. ‘एक्झिट पोल’ करणारी संस्था डेमोग्रॉफी म्हणजे विविधता, सामाजिक सांस्कृतिक आणि अस्थिरता यावर लक्ष देत नाही. यामुळे ‘एक्झिट पोल’ चुकीचे ठरतात. 'एक्झिट पोल’चे निष्कर्ष चुकीचे ठरत असल्यामुळे त्यावर बंदी आणावी का, अशी एक चर्चा सुरू झाली आहे. निवडणूक आयुक्तांनीच त्यांच्यावर टीका केली होती. लोकसभा निवडणुकीनंतर यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल झाली होती; परंतु न्यायालयाने ती फेटाळली. दुसऱ्या बाजूला ‘एक्झिट पोल’चा परिणाम भारतातील शेअर बाजारावर होत असतो. दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीनंतर झालेल्या गेल्या तीन ‘एक्झिट पोल’ ची आकडेवारी आणि प्रत्यक्षातील निकाल पाहिला, तर त्यात मोठी तफावत दिसते. ‘एक्झिट पोल’ जाहीर झाल्यानंतर मतमोजणी सुरू होईपर्यंत त्याचे वेगवेगळे अर्थ काढले जातात. राजकीय पक्षही ‘एक्झिट पोल’च्या आकड्यांशी सहमत होत नाहीत. आजपर्यंत लागलेल्या निवडणुकांचे निकाल आणि ‘एक्झिट पोल’चे अंदाज यामध्ये कमालीची तफावत आढळली आहे, तर कधी कधी ते बरोबरही आले आहेत. सर्वसाधारणपणे मतदारांचा कल, जनमत यांची चाचपणी थेट लोकांशी संवाद साधून, त्यांना कोणत्या पक्षाचा उमेदवार चांगला वाटतो, कोणता पक्ष पाच वर्षे राज्य करायला हवा आहे हे जाणून घेतले जाते.

जगात सर्वांत अगोदर अमेरिकेत १९६७ साली ‘एक्झिट पोल’ची सुरुवात झाली, तर भारतात ‘एक्झिट पोल’ ची सुरुवात १९८० मध्ये प्रणय रॉय यांनी केली. त्यावेळी मासिकात प्रसिद्ध झालेला डाटा वापरला जात होता. त्यानंतर १९९० मध्ये सर्व्हे केलेला डाटा वापरुन ‘एक्झिट पोल’चे अंदाज प्रसिद्ध होऊ लागले. मतदान संपल्यानंतर सध्या विविध संस्थांचे ‘एक्झिट पोल’ जाहीर झाले, ज्यामध्ये कुठे भाजप, तर कुठे ‘आप’ चे सरकार स्थापन होताना दाखवले आहे. सर्वंच ‘एक्झिट पोल’मध्ये एक साम्य आहे, ते म्हणजे काँग्रेसला फक्त शून्य ते तीन जागा मिळू शकतात. दिल्लीतील मतदारांची संख्या दीड कोटींहून अधिक असताना मतदारांच्या मनातील कौल, हा केवळ हजारोंच्या ‘सॅम्पल साईझ’वरून सांगणे हे अन्ययाकारकच. भारतीय मतदारांच्या ‘मूड’चे आकलन करणे हे तितकेच कठीण काम. म्हणूनच ‘शितावरून भाताची परीक्षा’ याच दृष्टिकोनातून अशा सर्वेक्षणे, ‘एक्झिट पोल’कडे बघितले जाते. जागतिक पातळीवर या ‘एक्झिट पोल’वर फारसा विश्वास ठेवला जात नाही. बहुतांश ‘एक्झिट पोल’नुसार, या वेळी दिल्लीत भाजप सरकार स्थापन करणार आहे. फक्त दोन ‘एक्झिट पोल’नुसार ’आप’ला सरकार स्थापन करण्याची संधी आहे. दिल्लीतील बहुतांश जागांवर तिरंगी लढत होती. दिल्लीच्या निवडणुकीत पूर्वांचलमधील लोकांचा मोठा प्रभाव आहे; मात्र या वेळी त्यांची मते विभागली जात आहेत. केजरीवाल यांना यापूर्वी मिळालेली पूर्वांचली मत भाजपसह काँग्रेसला जातील. याशिवाय सर्वेक्षणात काँग्रेसची स्थिती शून्य दाखवत असली तरी त्यांना ५ ते ८ जागा मिळू शकतात. गेल्या निवडणुकीत भाजपला आठ जागा मिळाल्या होत्या, अशा स्थितीत भाजपची मतांची टक्केवारी वाढल्यास येथे चुरशीची लढत होईल आणि या निवडणुकीत आम आदमी पक्षाला सत्ता गमवावी लागण्याची शक्यता आहे.

# विश्वविजयात भारतीय महिलांची मुद्रा

**भारतीय अंडर-19 महिला टी-20 संघाने अभिमानास्पद कामगिरी करत जिंकून आणलेला वर्ल्ड कप ही महिला क्रिकेटमधील एक लक्षवेधी घटना आहे. त्याची दखल क्रिकेटप्रेमींना नक्कीच घ्यावी लागेल. एव्हाना भारतात महिला क्रिकेट फारसे दुर्लक्षित राहिले नसले तरी प्रेक्षकांचा उत्स्फूर्त पाठिंबाही मिळवताना दिसत नाही. तसा तो दिला, प्रशिक्षणाच्या उत्तम सुविधा मिळाल्या तर विश्वविक्रमही दूर नाही, हे या मुलींनी दाखवून दिले.**

लक्षवेधी

- मधुरा कुलकर्णी

पुरुषांच्या बरोबरीने आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळला जात असूनही, पुरुषांच्या क्रिकेटला दिले जाते तितके महत्व आजवर महिला क्रिकेटला दिले जात नव्हते. पण भारतीय अंडर-19 महिला टी-20 संघाने अभिमानास्पद कामगिरी करत जिंकून आणलेला वर्ल्ड कप ही महिला क्रिकेटमधील एक लक्षवेधी घटना आहे. त्याची दखल क्रिकेटप्रेमींना नक्कीच घ्यावी लागेल. मलेशियात खेळल्या गेलेल्या अंडर-19 महिला 20 विश्वचषक २०२५ साठी महिला निवड समितीने भारताच्या अंडर-19 संघाची घोषणा केली होती. निक्की प्रसाद (कर्णधार), सानिका चाळके (उपकर्णधार), जी. त्रिशा, कमलिनी जी. (विकेटकिपर), भाविका अहिरे (विकेटकिपर), ईश्वरी अवसरे, मिथिला विनोद, जोशिता व्हीजे, सोनम यादव, पारुनिका सिसोदिया, केसरी धृती, आयुषी शुक्ला, आनंदिता किशोर, एम. डी. शबनम, वैष्णवी एस. या खेळाडूंचा संघामध्ये समावेश होता. विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेचा नऊ गडी राखून पराभव केला आहे. संघाची कर्णधार निक्की प्रसाद आणि उपकर्णधार सानिका चाळके यांच्या नेतृत्वात भारतीय संघाने हा विश्वचषक आपल्या नावे केला. निक्की सिरिभगवान प्रसादची या विजयात महत्वाची भूमिका आहे. तिची कामगिरी पुरुषांच्या 1983 क्रिकेट एकदिवसीय विश्वचषकामध्ये कपिल देवने केलेल्या किंवा 2011 एकदिवसीय विश्वचषकात एम. एस. धोनीने केलेल्या कामगिरीसारखीच होती. २००८ च्या अंडर-19 पुरुष विश्वचषकातल्या विराट कोहलीच्या पराक्रमाशी तिची बरोबरी केली जाईल. कारण या महान खेळाडूंप्रमाणेच निक्कीही तिच्या संघाची कर्णधार होती.


ताज्या सनसनाटी विजयामुळे तिच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ अजेय बनला. २५ ऑक्टोबर २००५ रोजी जन्मलेली निकी केवळ एक उत्कृष्ट फलंदाजच नाही तर फिरकी गोलंदाजीने चमत्कारही दाखवते. उजव्या हाताने फलंदाजी करणारी आणि ऑफब्रेक चेंडू टाकणारी निकी दिल्ली कॅपिटल्सची खेळाडू आहे. निक्की प्रसादने चुलत भावासोबत खेळून क्रिकेटमधील कारकिर्दीला सुरुवात केली आणि सुरुवातीला टेनिस बॉल खेळली. हळूहळू तो लेदर बॉलशी खेळू लागला. आईच्या पाठिंब्याने तिने प्रोफेशनल क्रिकेट अकादमीत प्रवेश घेतला. सामना असो वा सराव असो, आईने तिला नेहमीच साथ दिली. महिला अंडर-19 टी-20 विश्वचषकापूर्वी भारताने तिच्या नेतृत्वाखाली आशिया कप जिंकला होता. संपूर्ण स्पर्धेत भारताविरुद्ध कोणताही संघ टिकू शकला नाही आणि अंतिम फेरीतही त्यांनी दक्षिण आफ्रिकेचा दणदणीत पराभव केला. आतापर्यंत काही संघांनी एक किंवा दोन चमकदार सामने खेळले आहेत, परंतु निकीच्या नेतृत्वाखाली भारतीय मुलींनी चमत्कार केले. अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेची कर्णधार कायला रेनेकेने टॉस जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. भारतीय गोलंदाजांनी या सामन्यात चमकदार कामगिरी केली. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा संघ 20 षटकात केवळ 82 धावांवर ऑलआऊट झाला. टीम इंडियाला सलग दुसऱ्यांदा चॅम्पियन होण्यासाठी फक्त 83 धावांची गरज होती. भारतीय संघाने या धावांचा सहज पाठलाग केला आणि अंतिम सामना जिंकला.

भारताकडून जी त्रिशाने सर्वाधिक तीन बळी घेतले तर वैष्णवी, आयुषी आणि पारुनिका सिसोदिया यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. शबनम शकीलला एक विकेट मिळाली. म्हणजे सर्वच गोलंदाजांनी संघाच्या विजयासाठी योगदान दिले. त्यामुळेच अंतिम सामन्यावर शेवटपर्यंत भारतीय गोलंदाजीचे वर्चस्व राहिले. नाणेफेकीनंतर आपल्या संघाला गोलंदाजी करावी लागली तर विरोधी संघाला कमीत कमी धावा करू देणे आणि आपल्या फलंदाजांना सोपे टार्गेट मिळवून देणे, हे कर्तव्य या सामन्यात गोलंदाजांनी व्यवस्थित पार पाडले, ही भारतीय संघाची जमेची बाजू म्हणायला हवी. त्यामुळेच सामन्याच्या विजयाला मोलाचा हातभार लागला. गोलंदाजांच्या या प्रशंसनीय कामगिरीनंतर भारतीय फलंदाजांनीही छान कामगिरी केली. ८२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना टीम इंडियाने फक्त एक विकेट गमावली. टीम इंडियाची सलामीवीर जी. कामिनी आठ धावा करून बाद झाल्यानंतर सानिका चाळके आणि गोंगाडी त्रिशाने भारताला विश्वचषक मिळवून दिला. ‘अ’ गटात पाकिस्तानविरुद्ध खेळल्या गेलेल्या पहिल्या सामन्यात शून्यावर बाद झाल्यानंतर संपूर्ण स्पर्धेत आक्रमक फलंदाजी करणाऱ्या गोंगाडी त्रिशाने अंतिम सामन्यातही निराशा केली नाही. त्रिशाने ३३ बॉल्समध्ये ८ चौकार मारत ४४ धावा केल्या. सानिका चाळकेने 22 बॉल्समध्ये 26 धावा करून भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिकेला बजावली. सलामीवीर गोंगडी त्रिशा हिचा फॉर्म स्पर्धेत सर्वोत्कृष्ट राहिला. दुसरी सलामीवीर आणि डावखुरी फलंदाज जी. कमालीनेदेखील उत्तम कामगिरी केली.

एक मात्र झाले. सलामीवीर शानदार कामगिरी करत असल्याने भारताच्या मधल्या फळीतील फलंदाजांना चमक दाखवायची फारशी संधी मिळाली नाही. भारताच्या गोलंदाजांनीही चांगली कामगिरी केली. वैष्णवी शर्मा आणि आयुषी शुक्ला या दोघी जास्त विकेट्सच्या घेणाऱ्यांच्या यादीत आघाडीवर राहिल्या. याआधी भारतीय संघाने उपांत्य फेरीतदेखील इंग्लंडचा 9 गडी राखून सहज पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश निश्चित केला होता. त्याआधीच्या साखळी सामन्यांमध्ये भारताने न्युझिलंडला 160/4 विरूद्ध 102/10, पाकिस्तानला 108/4 विरूद्ध 105/8, श्रीलंकेला 172/3 विरुद्ध 90/10 तर ऑस्ट्रेलियाला 151/8 विरुद्ध 142/9 असे चुरशीचे सामने खेळत उत्तम फरकाने साखळी सामने जिंकले आणि अप्रतिम खेळाचे प्रदर्शन करत चषक खेचून आणला. आतापर्यंत सहा राष्ट्रीय संघांनी टी 20 विश्वचषक जिंकला होता. वेस्ट इंडिज (2012, 2016), इंग्लंड (2010, 2022) आणि भारत (2007, 2024) या तीन संघांनी प्रत्येकी दोनदा ही स्पर्धा जिंकली होती. महिला क्रिकेटमधल्या तीन प्रमुख संघांची ही आजवरची कामगिरी होती. भारतीय महिला संघाने तीन वेळा ही स्पर्धा जिंकून नवा विक्रम प्रस्थापित केला. ही प्रत्येक भारतीयाला अभिमानास्पद वाटावी अशी बाब आहे. आपापसात उत्तम ताळमेळ असलेले सर्वोत्तम खेळाडू असलेल्या संघाकडूनच अशी कामगिरी केली जाऊ शकते. भारतीय संघाने हे कसब सिध्द केले.

भारतीय महिला संघाने आजवर 199 टी 20 आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. त्यापैकी 108 जिंकले तर 84 गमावले. सहा सामन्यांचा निकाल लागला नाही. जून 2024 पर्यंत भारत 263 रेटिंग गुणांसह महिला आणि 20 संघ क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर आहे. भारतीय संघाने 2012, 2016, 2022 मध्ये टी 20 एशिया कपही जिंकला आहे. याव्यतिरिक्त, या संघाने 2022 आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक तर 2022 राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक जिंकले आहे. भारतीय महिला क्रिकेट संघातील फलंदाजांच्या मजबूत फळीच्या रूपाने स्मृती मानधना, शफाली वर्मा आणि दयालन हेमलता ही टॉप-ऑर्डर फायर पॉवर सारखी होती. जेमिमाह रॉड्रिग्स, दीप्ती शर्मा आणि ऋचा घोष यांच्या भक्कम मध्यम फळीच्या रूपाने फलंदाजीची खोली आणखी वाढण्यास मदत झाली. त्यामुळे फलंदाजीचे एक मजबूत आणि गोलाकार युनिट तयार झाले. गोलंदाजांनी त्यांना मोलाची साथ देत विश्वचषक खेचून आणला. मलेशियातील वर्चस्वपूर्ण प्रदर्शनानंतर कर्णधार निकी प्रसाद हिने भारतीय संघ अव्वल राहील याची भारतीयांना खात्री दिली आहे. भारतीय पुरुष संघाची कामगिरी देशवासीय नेहमीच डोळे भरुन पाहतात, त्यांच्याकडून खेळाडूंना उत्स्फूर्त पाठबळ लाभते. असाच पाठिंबा आणि कौतुक मुलींच्या या उदयोन्मुख संघाला लाभले पाहिजे. तसे झाले तर महिला क्रिकेटपटूंमधून उद्याच्या विराट कोहली, रोहीत शर्मा आणि एखादाअ सचिन तेंडुलकरही जन्मू शकेल.




## राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाचा दिलासा मिळेल. मुलांची प्रगती होईल. प्रकृतीच्या तक्रारी दूर होतील.
- **वृषभ** : नव्या जबाबदाऱ्या विचारपूर्वक स्वीकारा. आध्यात्मिकतेकडे ओढा राहील. आर्थिक ताण कमी होईल.
- **मिथुन** : कोणतेही निर्णय घाईने घेऊ नका. कलाकारांना उत्तम संधी लाभतील. आनंदी, समाधानी रहाल.
- **कर्क** : घर दुरूस्तीच्या कामांना गती येईल. प्रवास शक्यतो टाळायला हवा. व्यवसायात बरी स्थिती राहील.
- **सिंह** : आजच्या दिवसात महत्त्वाचे लाभ होतील. जुन्या स्मृतींना उजाळा मिळेल. रखडलेली कामं होतील.
- **कन्या** : कौटुंबिक वाद–विवाद संभवतात. आर्थिक व्यवहारात जाणकारांचा सल्ला घ्यावा. विचारानं रहावं.
- **तूळ** : रखडलेली कामं मार्गी लागतील. आध्यात्मिकतेकडे ओढा राहील. विवाहाच्या प्रयत्नात यश मिळेल.
- **वृश्चिक** : कार्यक्षेत्रात प्रगतीच्या संधी लाभतील. प्रियजनांचा सहवास लाभेल. आर्थिक बाबतीत ताण राहील.
- **धनु** : सर्वच बाबतीत अनुकूलता राहणार आहे. स्वमताग्रह टाळायला हवा. आप्तेष्टांच्या भेटीने आनंद होईल.
- **मकर** : महत्त्वाचे करार पार पडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील.
- **कुंभ** : वैद्यकीय कारणांसाठी खर्च होईल. प्रवासात मौल्यवान वस्तुची काळजी घ्यावी. येणी वसूल होतील.
- **मीन** : नव्या योजना मार्गी लागतील. स्थावर प्रश्नात लाभ संभवतो. पित्ताच्या विकाराबाबत काळजी घ्या.

## ८ फेब्रुवारी

दिनविशेष

२०१३ : युरोपीय संघाने गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावर दहा वर्षांपासून टाकलेला बहिष्कार मागे घेतला.

२०१४ : जनलोकपाल विधेयकासाठी कोणत्याही थराला जाण्याची दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची धमकी.

२०१८ : जन्मठेपेची शिक्षा कमी करुन घेण्यासाठी मंत्रालयात आलेल्या हर्षल रावते नामक तरुणाने मंत्रालयातील पाचव्या मजल्यावरुन उडी मारुन आत्महत्या केली.

## निद्रानाश करा दूर

आरोग्यमंत्र

आजकाल निद्रानाशाच्या तक्रारी वाढत चालल्या आहेत. अनेक लोक निद्रानाशाच्या समस्येने ग्रस्त असतात. झोपेशी संबंधित चुकीच्या सवयी, काही मानसिक तसंच शारीरिक आजारांमुळे निद्रानाश उद्‍भवू शकतो. निद्रानाशामुळे दैनंदिन कामाकाजावर परिणाम होऊ शकतो. आरोग्य बिघडू शकतं. त्यामुळे ही समस्या वरचेवर उद्‍भवत असेल तर त्याचे परिणाम आणि उपचारांविषयी माहिती असायला हवी.



अस्थमा, नैराश्य, कॅन्सर, वेदना, औषधं किंवा आहारातल्या काही घटकांमुळे झोपेत अडथळे येत असतील तर तो दुसऱ्या स्तरातला निद्रानाश समजला जातो. ताणतणाव, नैराश्य तसंच इतर शारीरिक व्याधी, झोपेशी संबंधित चुकीच्या सवयी, कॅफेनचा अतिरिक्त वापर, अचानक मद्यपान सोडणं, हार्मोन्समधले बदल, वाढतं वय, विविध देशांमधला प्रवास, अतिव्यायाम या बाबी निद्रानाशाला कारणीभूत ठरतात. ताजंतवानं न वाटणं, दिवसभरात जास्त झोपणं, दैनंदिन कामात अडथळे, थकवा येणं, एकाग्रता कमी होणं, अस्वस्थ वाटणं, खूप राग येणं, विस्मरण होणं, नैराश्य, काही करावंसं न वाटणं अशी लक्षणं जाणवतात. निद्रानाश तात्पुरत्या स्वरूपाचा असेल तर झोपेचं वेळापत्रक बनवा. विशिष्ट वेळेला झोपा. या लोकांनी दिवसा झोपणं टाळावं. झोपण्याआधी चहा, कॉफी, मद्यपान टाळावं. नियमित व्यायाम करावा. रात्री हलका आहार घ्यावा. आठवड्यातून तीन किंवा जास्त रात्री झोप येत नसेल किंवा ही समस्या सलग काही आठवडे किंवा महिने जाणवत असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा.

## वृक्ष संवर्धनासाठी...

महत्त्वपूर्ण काही...

वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन ही काळाची गरज ठरू लागली आहे. त्यामुळे या संदर्भात व्यापक प्रमाणात विविध स्वरूपातील प्रयत्न केले जात आहेत. त्यात आता ‘बीज गोळे’ या संकल्पनेची भर पडली आहे. यामध्ये विविध झाडांच्या बिया एकत्र करून त्यावर चिखलाचा लेप दिला जातो. त्याद्वारे बिया संरक्षित केल्या जातात. नंतर बियांचे हे बीज गोळे जंगलात, डोंगरांवर, उजाड माळरानांवर टाकले जातात. त्यातील बिया जमिनीत रूजून नव्या झाडांच्या उगवणीस मदत होते. असं असलं तरी या प्रयोगाचे अपेक्षित परिणाम दिसून येण्यातही काही अडचणी आहेत. जंगलातील काही सजीव या मातीवेष्टीत बियांनाही आपलं खाद्य बनवतात. तसंच पाण्याच्या जवळ न पडलेल्या वा पाण्याचं दुर्भिक्ष असलेल्या ठिकाणी पडलेल्या बीजगोळ्यातील बिया रूजणं, त्यांना अंकुर येणं कठीण असतं. या काही अडचणी लक्षात घेऊन आपण गच्चीतील कुंडीत, आवारात टेरेसवर आवडत्या झाडांच्या बिया कुंड्यांमध्ये रूजवायला हव्या. या बियांपासून थोडीशी मोठी झाडं तयार झाली की त्यांचं डोंगर उतारावर, टेकड्यांवर रोपण करायला हवं. याद्वारे झाडं अधिक प्रमाणात उत्तम तऱ्हेनं रूजून त्यांची चांगली वाढ होऊ शकेल.

## बिनधास्त वापरा स्लिव्हलेस

सल्ला मोलाचा

फॅशनविश्वात स्लिव्हलेस कपड्यांची बहार पहायला मिळते. येऊ घातलेल्या उन्हाळ्यासाठी अशा कपड्यांची तीव्रतेनं गरज भासते. मात्र यासाठी अंडरआर्म्स काळपट असणं अजिबात उपयोगी नाही. काही सोप्या उपायानं अंडरआर्म्सचा काळपटपणा कमी होऊ शकतो. ✻ अंडरआर्म्सवर लिंबाच्या सालीनं १० ते १५ मिनिट मसाज करा. लिंबाच्या फोडीवर मीठ अथवा साखर घालू शकता. हा उपाय दोन–तीन दिवसांनी एकदा केल्यास अल्पावधीतच त्वचा उजळलेली दिसेल. ✻ त्वचेचा गडदपणा कमी करण्यासाठी साखरपाण्याचा उपयोग होऊ शकतो. या मिश्रणानं स्क्रब केल्यास अंडरआर्म्सच्या त्वचेचा वर्ण उजळतो. ✻ बेकिंग सोडा आणि पाणी एकत्र करून पेस्ट तयार करा. या पेस्टनं अंडरआर्म्सना मसाज करा. यामुळे रंग हलका होतो. यात गुलाबपाणी मिसळल्यास अधिक चांगले परिणाम बघायला मिळतात. ✻ दूध आणि केशर एकत्र करून मसाज केल्यास त्वचा उजळते. या कामी नारळाचं तेल उपयुक्त ठरतं. या तेलात लिंबाचा रस आणि दही एकत्र केल्यानंही अंडरआर्म्सचा काळपटपणा दूर होण्यास मदत होते.

## पंचांग

**शनिवार, ८ फेब्रुवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
माघ शु. ११, नक्षत्र : मृगशीर्ष
चंद्रराशी : मिथुन, वैधृति योग,
सूर्योदय : ७.१०, सूर्यास्त : ६.३५

## फॉरवर्डस

बऱ्याचदा शांततासुध्दा आपल्याला खूप काही सांगून जाते...

**कुछ नही है आज मेरे शब्दों के गुलदस्ते में,
कभी मेरी खामोशियां भी पढ लिया करो।**


## वाचा तर खरं

✻ आर्द्रता असणाऱ्या ठिकाणी जीवजंतूच्या वाढीची शक्यता अधिक असते. बॅक्टेरियांमुळेच एखादी वस्तू खराब होते, तिला दुर्गंध येऊ लागतो. अशा ठिकाणी सिलिका जेल पाऊच ठेवू शकतो. ✻ बरेचदा मेक अप किट खराब होतं. त्यातील ताजेपणा हरपतो. अशा वेळी किटमध्ये सिलिका जेल पाऊच ठेवावं. यामुळे किट सुगंधी राहून सौंदर्यप्रसाधनांमधील अतिरिक्त ओलावा शोषला जातो. ✻ बराच काळ ठेवल्यास चांदीची उपकरणं, वस्तू काळ्या पडतात. त्यामुळे चांदीची भांडी ठेवलेल्या बॅगमध्ये हे पाऊच ठेवलं तर भांडी काळी पडत नाहीत.

## टाळा या चुका

फॅशन पॅशन

दोस्तांनो, या फॅशनच्या युगात सतत नवनवीन काही घडत असतं. ते लक्षात घेऊन तुम्हीही नवनव्या फॅशन्सचा अवलंब करत असाल. परंतु फॅशन्सचा अवलंब करताना काही चुका होण्याची शक्यता असते. असं झाल्यास स्मार्ट लूक प्राप्त करता येत नाही. त्यामुळे अशा कोणत्या चुका होऊ शकतात आणि त्यांचे काय परिणाम दिसून येतात, हे जाणून घ्यायला हवं.



✻ योग्य फिटिंग नसलेला शर्ट घालणं ही मुलांची मोठी चूक ठरते. मोठ्या आकाराच्या शर्टमध्ये तुम्ही शोभून दिसत नाही. असे शर्ट घातल्यानंतर शरीर फुगल्यासारखं वाटतं. असे फुगीर शर्ट अजिबात घालू नका.

✻ शर्टच्या आतमधला बनियन किंवा टी शर्ट दिसता कामा नये. शर्टची काही बटणं उघडी ठेवायची असतील तर व्ही नेकवाला शर्ट घाला. शर्टच्या आतमधला टी शर्ट दिसणं चांगलं नसतं. ही फॅशनबाबतीतली मोठी चूक ठरू शकते.

✻ सेलमध्ये किंवा इतर काही कारणांमुळे पुढच्या वर्षी वापरण्यासाठीचे कपडे आधीच घेतले जातात. हीसुध्दा चूक आहे. कारण काही दिवसांनी फॅशन बदलेली असते. त्यातच कपडे घालतेवेळी तुम्ही घेतलेला साईज बसेलंच याची शाश्वती नसते.

✻ मोठे खिसे असणाऱ्या पँट घालू नका. या जीन्स पुरुषांसाठी तयार केल्या नाहीत. त्यांच्या वॉर्डरॉबमध्ये समावेशाची गरज नाही. चिनोज किंवा स्ट्रेज जीन्स खरेदी करा.

## प्रतिक्रिया

खेचाखेची

एक बातमीदार एका दारू पिणाऱ्या व्यक्तिला विचारतो, ‘डिजिटल इंडिया’ ही संकल्पना यशस्वी होतीये का?

**दारूडा** : मला ’अ‍ॅमेझॉन‘वर दारूची बाटली ऑर्डर करता येईल आणि ‘ओएलक्स’वर ती बाटली विकता येईल तेव्हाच डिजिटल इंडिया संकल्पना यशस्वी झाली असं म्हणता येईल. तोपर्यंत ही केवळ वल्गनाच ठरणार आहे.


## वेगळे काही

कमी उंचीमुळे आपल्याला अपमानित झाल्यासारखं वाटत असेल तर आपल्यासाठी एक खुशखबर आहे. कमी उंचीच्या लोकांना जास्त आयुष्य लाभतं असं एका अध्ययनातून दिसून आलं आहे. हे अध्ययन जपानी पुरुषांवर करण्यात आलं. त्यामध्ये कमी उंचीच्या लोकांच्या शरीरातील जीन जास्त संरक्षक असतात, असं आढळलं. या जीनमुळे त्यांच्या शरीराची उंची कमी होते. पण, त्यांना जास्त आयुष्य प्राप्त होतं. अशा लोकांच्या रक्तामध्ये साखरेचं प्रमाण कमी असतं. त्यांना कर्करोग होण्याचा धोकाही कमी असतो.

## घ्या ॲप्सचा आधार

व्हा टेक सॅव्ही

आजकाल स्मार्टफोनचा वापर बराच वाढला आहे. विशेषत: स्मार्टफोनमधील ॲप्स काही बाबतीत कामी येत आहेत. कारकिर्दीच्या आणि घरच्या अशा दुहेरी जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या महिलांसाठी काही ॲप्सचा चांगला आधार मिळू शकतो. त्यादृष्टीने सरकारी सेवा घरबसल्या उपलब्ध करून देणाऱ्या ॲप्सविषयी जाणून घेऊ,,,



✻ लांब पल्ल्याच्या गाड्यांचं तिकिट आरक्षित करण्यासाठी आयआरसीटीसीची वेबसाईट आहे. परंतु युटीएस ॲप डाउनलोड करून लोकल गाड्यांचं तिकिटही सहज आरक्षित करता येतं. यामुळे लोकलच्या तिकीटासाठी रांगेत उभं राहण्याचा त्रास वाचतो.

✻ पासपोर्टविषयक सर्व माहिती एम–पासपोर्ट नावाच्या ॲपवर उपलब्ध आहे.

✻ मुलांसाठी स्कॉलरशीपच्या दृष्टीने नॅशनल स्कॉलरशीप पोर्टलला भेट द्या.

✻ स्मार्टफोनच्या सुरक्षेसाठी एम–कवच हे सरकारी ॲप डाउनलोड करा. मालवेअर, व्हायरस तसंच स्पॅम कॉल्सना दूर ठेवण्याचा हा सर्वात चांगला उपाय आहे.

✻ विविध सरकारी कामं उमंग ॲपमुळे सोपी झाली आहेत. इथे सरकारी योजनांची माहिती उपलब्ध आहे.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ **http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com**

» Selected

## वेब डेव्हलपमेंट कार्यशाळा उत्साहात



**बारामती :** विद्या प्रतिष्ठानच्या कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील बीबीए (सीए) विभागामार्फत नुकतीच एक दिवसीय वेब डेवलपमेंट टेक्नोलॉजिज या विषयवार कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेत १९० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विभागप्रमुख महेश पवार यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये वेब डेवलपमेंट तंत्रज्ञानाच्या सतत विकसित होत असलेल्या क्षेत्रात, वेब विकास हा डिजिटल युगाचा आधारस्तंभ आहे. ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मपासून परस्परसंवादी सोशल नेटवर्क्सपर्यंत, आपण दररोज वापरत असलेल्या वेबसाइट्स आणि ॲप्लिकेशन्स ही कुशल वेब डेव्हलपरची निर्मिती आहे. २०२५ मध्ये या टेक्नोलॉजिज मुळे कृत्रिम तंत्रज्ञान क्षेत्रातील संभाव्य उपलब्ध संधी प्राप्त होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन केले. या कार्यशाळेला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भरत शिंदे, उप-प्राचार्य डॉ.शामराव घाडगे, डॉ. लालासाहेब काशीद यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन वैशाली पेंढारकर यांनी केले. आभार प्रदर्शन पूनम गुंजवटे यांनी केले.

## सासवडच्या पालखी तळावर विक्रमी सूर्यनमस्कार



**सासवड :** रथ सप्तमीचे औचित्य साधून २ तारखेला सासवडच्या पालखी तळावर अखंड बारा तास सूर्य नमस्कार यज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. त्याला सासवड व परिसरातून विक्रमी प्रतिसाद मिळाला. या उपक्रमात ३६५ स्त्री, पुरुष व मुलांनी सहभाग नोंदवत, दिवसभरात सुमारे २२ हजारांहून अधिक सूर्य नमस्कार घालत अभिनंदनीय उपक्रम पार पाडला. येथील योग विद्या संस्कार केंद्र, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व योगप्रेमी संस्था यांच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तीन वर्षांच्या मंजिरी अमोल बागडे ते ८२ वर्षीय राजाराम खळदकर यांनी या उपक्रमात सहभाग घेत कार्यक्रमाची उंची वाढवली. सूर्य नमस्कार करणाऱ्या साधकांना प्रशस्तीपत्र, दुध व चिक्की वाटप करण्यात आले. याच कार्यक्रमात मल्लखांब प्रात्यक्षिके देखील कऱण्यात आली. त्यात १५ जणांनी सहभाग घेवुन चित्त थरारक कसरती केल्या. भारत मातेच्या प्रतिमेचे पुजन, अग्नीहोत्र प्रज्वलन, सूर्यमंत्राचे अखंड पठण यामुळे सासवडच्या पालखी तळावर हा सोहळा विशेष लक्षवेधी ठरला. अखंड बारा तास सूर्य नमस्कार उपक्रमाबरोबरच कला गुणांना वाव देण्याच्या उद्देशाने छोट्या व खुल्या गटात रांगोळी आणि चित्रकला स्पर्धेचे देखील आयोजन करण्यात आले होते त्यालाही प्रतिसाद मिळत २५० जणांनी चित्रकला व ४५ जणांनी रांगोळी स्पर्धेत भाग घेतला. विजेत्या स्पर्धकांना प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. डॉ घनशाम खांडेकर, डॉ ऋता खांडेकर, मोहन बागडे, अमोल बागडे, सुनील रासकर, बाळासाहेब जगताप, महादेव जगताप यांसह अन्य योगप्रेमींनी या कार्यक्रमाचे सुंदर आयोजन केले.

## पुरंदर मेडिकल असोसिएशनच्या वतीने पोलिसांची आरोग्य तपासणी



**जेजुरी :** चोवीस तास नागरिकांची सुरक्षितता, तसेच कायदा व सुव्यवस्थेचे काम करणाऱ्या पोलीस बांधवांचे आरोग्य चांगले राहावे, या हेतूने पुरंदर मेडिकल असोशियशनच्या वतीने जेजुरी पोलीस स्टेशन मधील पोलीस बांधवांची आरोग्य तपासणी करण्यात आली. पुरंदर मेडिकल असोसिएशन व जेजुरी पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जेजुरी पोलीस स्टेशनच्या मार्तंड सभागृहात आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्‌घाटन पुरंदर मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ प्रवीण जगताप, जेजुरी पोलीस स्टेशनचे स पो नी दीपक वाकचौरे यांच्या हस्ते करण्यात आले. पुरंदर मेडिकल असोसिएशनच्या वतीने दरवर्षी संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील वारकरी, शालेय विद्यार्थी, दिव्यांग यांच्या आरोग्य सेवेसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन केले जाते. या आरोग्य शिबिरात नेत्र तपासणी, हृदयरोग, दंत, मधुमेह, स्त्री आरोग्य तपासणी, त्वचारोग आदींची तपासणी करून औषोधपचार करण्यात आले. पुरंदर मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ प्रवीण जगताप, उपाध्यक्ष डॉ शामा केंजळे, डॉ सचिन निरगुडे, सचिव डॉ सुमित काकडे, डॉ नितीन केंजळें, डॉ उमाकांत ढवळे, डॉ अस्मिता पोखरणिकर, डॉ वृषाली जगताप, डॉ निनाद खळदकर, डॉ सुनील बोत्रे, डॉ स्वप्नील महाजन, डॉ संजय गळवे, डॉ प्रदीप मगदूम, डॉ जयश्री होले आदींनी ही आरोग्य तपासणी केली.

# भाजपकडून विशेष नियुक्त्या

## पक्षाचा पालकमंत्री नाही तेथे शॅडो कॅबिनेट म्हणून काम पाहणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** राज्यात महायुतीचे तीन प्रमुख पक्षांचे सरकार सत्तेत आहे. मात्र, पालक मंत्रिपदावरून महायुतीमध्ये उघड उघड धुसफुस दिसून येत असून, काही ठिकाणी तीव्र संघर्ष सुरू आहे. त्यामुळे भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांना न्याय देण्यासाठी संपर्कप्रमुख हे नवे पद भाजपने निर्माण केले आहे. जिथे भाजपचा पालकमंत्री नाही, त्या जिल्ह्यात संपर्कमंत्री हे शॅडो कॅबिनेट म्हणून काम करणार असल्याने भाजप कार्यकर्त्यात उत्साह आहे.



संपर्क मंत्री नेमून अप्रत्यक्षपणे मित्रपक्षाच्या पालक मंत्र्यांवर नियंत्रण रहावे, आपल्या कार्यकर्त्यांवर अन्याय होवू नये, महायुती मधील सर्व पक्षांच्या कामात सुसूत्रता रहावी यासाठी भाजपने हे दूरदृष्टी ठेवून पद निर्माण केले असल्याचे चित्र आहे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला हा एक प्रकारे शह काट शह. देण्याचा भाजपचा प्रयत्न असल्याची राजकीय वर्तुळात प्राथमिक चर्चा आहे.

कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्रिपद आपल्यालाच मिळावे, जेणे करून मतदार संघाचे प्रश्न प्राधान्याने सोडविणे सोपे जावे असा राजकीय नेत्यांचे प्रयत्न असतो. सरकार स्थापन झाल्यानंतर मंत्रिपद आणि चांगल्या खात्यासाठी संपूर्ण ताकदीने व युक्तीने शक्ती प्रदर्शन होते, त्याप्रमाणेच आपल्या जिल्ह्याचे पालक मंत्री पद मिळावे, यासाठी संपूर्ण ताकद पणास लावली जाते.

शेवटी ताकद लावून देखील तिन्ही प्रमुख पक्षातील वजनदार नेत्यास पालक मंत्री पद मिळाल्यानंतर इतर इच्छुक नाराज होतात. हे पाहून भाजपने चाणाक्षपणे संपर्कपद निर्माण करून आपल्या विचारांच्या नेत्यांना संपर्कपद देवून कार्यकर्त्यांचे प्रश्न सोडविण्याची संधी दिली आहे. भाजप मधील नाराजी शामविण्यासाठी आणि पक्षातील कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांच्या कामासाठी भाजपने संपर्कमंत्री हे नवे पद निर्माण केले असले तरी महायुती तील इतर सहकारी पक्ष देखील हा कित्ता गिरवून आपल्या कार्यकर्त्यांना न्याय देवू शकतात.

पालकमंत्री पदाच्या सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर संपर्कमंत्री हे नवे पद निर्माण करून कार्यकर्त्यांचे प्रश्न सोडविण्यावर पक्षाचा भर असेल. पक्षाच्या कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांचे आणि त्यांच्या माध्यमातून जनतेचे कोणतेही काम अडू नये तसेच सरकारमध्ये पक्ष कार्यकर्त्यांचाही सहभाग असावा, यासाठी संपर्कमंत्री प्रयत्न करतील, असे भाजपच्या वतीने सांगण्यात येत आहे. ज्या जिल्ह्यात भाजपचा पालकमंत्री नाही, तिथे जाऊन संपर्कमंत्री कार्यकर्त्यांच्या भावना जाणून घेतील.

**भाजपचे संपर्कमंत्री पुढील प्रमाणे :**

- ठाणे- गणेश नाईक, पालकमंत्री एकनाथ शिंदे.
- बीड- पंकजा मुंडे, पालकमंत्री - अजित पवार
- संभाजीनगर- अतुल सावे, पालकमंत्री- संजय शिरसाट.
- पुणे- चंद्रकांत पाटील, पालकमंत्री- अजित पवार.
- कोल्हापूर- माधुरी मिसाळ, पालकमंत्री- प्रकाश आबिटकर.
- रत्नागिरी- उदय सामंत, पालकमंत्री- आशिष शेलार.

## ज्येष्ठ नागरिकाला अन्नापूरमध्ये मारहाण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** अन्नापूर (ता. शिरुर) येथे त्र्याहत्तर वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला घर नावावर करुन देण्यासाठी पुतण्याकडून बेदम मारहाण करत जखमी करण्यात आल्याची घटना घडली असल्याने, शिरुर पोलीस स्टेशन येथे रामदास उर्फ मुसाभाई सिताराम जाधव याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अन्नापूर येथील वसंत जाधव हे घरात असताना रात्रीच्या वेळी त्यांचा पुतण्या रामदास उर्फ मुसाभाई हा दरवाजाला लाथ मारून घरात आला. त्यावेळी वसंत यांनी तू रात्रीचा घरात का आला, असे म्हणाले असता, हे घर माझ्या नावावर करुन दे असे रामदास म्हणाला, त्यावेळी वसंत यांनी नकार दिला असता, रामदास याने फिर्यादी वसंत यांना बेदम मारहाण करत जखमी करुन जीवे मारण्याची धमकी दिली. यावेळी शेजारील भाऊ गिरे यांनी वसंत यांना मारहाणीतून सोडवले. याबाबत वसंत मल्हारी जाधव (७३, रा. अन्नापूर ता. शिरुर) यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी रामदास उर्फ मुसाभाई सिताराम जाधव याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# माघ पौर्णिनिमित्त धामणीत यात्रा

## नवसाचे बैलगाडे धावणार; धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क


संग्रहित छायाचित्र

**लोणी-धामणी :** माघ पौर्णिमेनिमित्त धामणी (ता. आंबेगाव ) येथील म्हाळसाकांत खंडोबा देवाची यात्रा बुधवार (दि १२) व गुरुवार (दि. १३) रोजी संपन्न होणार आहे. दोन्हीही दिवस नवसाचे बैलगाडे घाटात धावणार आहेत. यासाठी बैलगाडा मानकांची टोकण पद्धतीने नाव नोंदणी होईल, अशी माहिती देवस्थानचे अध्यक्ष प्रकाश जाधव पाटील व यात्रा कमिटीचे अध्यक्ष गजाराम जाधव पाटील यांनी दिली आहे.

माघ पौर्णिनिमित्त श्री म्हाळसाकांत खंडोबा देवाची यात्रा भरते. बुधवार (दि. १२) रोजी सकाळी ८ ते १० वाजता देवास हारतुरे, ११ ते ०७ वाजता बैल व बगाडांची मिरवणूक व बैलगाडा शर्यती होणार आहे. दुपारी ३ ते ६ वाजता देवास नवसाचे बगाड दाखविणे, रात्री ८ ते १० वाजत छबीना व पालखी सोहळा हा ढोल लेझिम पथकासह होईल व त्यानंतर हरिभाऊ बढे नगरकर व ढोलकी सम्राज्ञी शिवकन्या बढे यांचा लोकनाट्य तमाशाचा कार्यक्रम होईल. गुरुवार (दि.१३) रोजी ८ ते १२ वाजता कलगीतुऱ्याचा कार्यक्रम होईल व दुपारी ४ ते ७ वाजता कुस्त्यांचा जंगी आखाडा होणार आहे.

रात्री नऊ वाजता साहेबराव नांदवळकर यांच्या आश्रयाखाली वसंतराव नांदवळकर सह रविंद्र पिंपळेकर यांचा लोकनाट्य तमाशाचा कार्यक्रम होईल. यात्रेचे विशेष आकर्षण म्हणजे म्हणजे यात्रेच्या दोन्ही दिवशी नवसाचे बैलगाडे धावतात. यासाठी कोणतेही बक्षिस दिले जात नाही. केवळ श्रध्देपोटी भाविक नवसाचे बैलगाडे आणून घाटात पळवितात. विशेष म्हणजे तालुक्यात थापलिंग व धामणी येथेच नवसाचे बैलगाडे धावतात आणि गाडामालक स्वतः या ठिकाणी बैलगाड्यासह मोठ्या आनंदी व उत्साही वातावरणात सहभागी होतात. गाडा मालकांची टोकण पद्धतीने नावनोंदणी केली जाणार असून यात्रेच्या दोन्ही दिवशी टोकन पद्धतीने बैलगाड्यांचा थरार बैलगाडा शौकिनांना पाहायला मिळणार आहे. यात्रा कमिटीने बैलगाडा घाटाचे काम पूर्ण केले आहे व घाटाच्या दुतर्फा झाडे लावण्यात आली आहे.

मंदिरांकडे जाणारे रस्ते, मंदिर परिसर, प्रवेशद्वार,भक्त निवास,बाजार ओट्यांची साफसफाई करण्यात आली आहे तसेच श्री म्हाळसाकांत खंडोबा परिसरात विविध विकासाची कामे झाल्याचे देवस्थान, यात्रा कमिटी व पंचायत समितीचे माजी सदस्य रविंद्र करंजखेले, सरपंच रेश्मा बोऱ्हाडे,उपसरपंच अक्षय विधाटे व माजी सरपंच सागर जाधव व ग्रामस्थांच्या वतीने सांगण्यात आले आहे.

### कर भरा आणि बक्षिसे जिंका योजना सादर

# वळती ग्रामपंचायतीची करवसुलीसाठी मोहीम




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** विविध कर खातेदारांनी भरावेत यासाठी वळती (ता. आंबेगांव ) ग्रामपंचायतीने बक्षीस योजना सुरू केली आहे. "कर भरा आणि विविध बक्षिसे जिंका" अशा योजनेचा नुकताच शुभारंभ करण्यात आला, अशी माहिती सरपंच आनंद वाव्हळ व उपसरपंच तेजस भोर यांनी दिली.

ग्रामपंचायतीची चालू व थकीत कराची थकबाकी वाढली आहे. त्याचा विकासकामांवर मोठा परिणाम होतो. करदात्यांना वेळोवेळी सूचना देऊनसुद्धा अपेक्षित वसुली होत नाही. यावर शक्कल म्हणून ही बक्षिस योजना ग्रामपंचायतीने राबवली आहे.

कर भरणाऱ्या करदात्याला फ्रिज, एलईडी टीव्ही, कुलर, टेबल फॅन, बॅटरी, पाण्याचे जार अशी विविध एकुण ४० बक्षिसे दिली जाणार आहेत. ग्रामपंचायत कर भरणाऱ्या करदात्यांना लकी ड्रॉ काढून बक्षिसे दिली जाणार आहेत.

या वर्षी ३१ मार्च २०२५ पर्यंत ग्रामपंचायतीने १०० टक्के करवसुलीसाठी लकी ड्रॉ पद्धतीने बक्षीस योजना जाहीर केली आहे. त्यामुळे मागील थकबाकी व चालु वर्षीचा कर भरणाऱ्या सर्व करदात्यांना या योजनेचा लाभ होणार आहे. ३१ मार्चपर्यंत कर भरण्याची मुदत असुन गुरुवारी दि. १ मे रोजी पुर्णपणे कर भरणाऱ्या करदात्यांचा लकी ड्रॉ पद्धतीने सोडत होणार आहे.

## बोअरवेलच्या गाड्या आंबेगाव पूर्वेला दाखल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** आंबेगाव तालुक्याचा पूर्व भागात उन्हाळ्याची चाहूल लागली असून, शेतकऱ्यांनी आतापासूनच पाणीटंचाईला उपाय म्हणून बोअरवेल घेण्यास सुरुवात केली आहे. या परिसरात परराज्यातून बोअरवेल व्यावसायिक दाखल झाले आहेत.

तालुक्याच्या पूर्व भागातील पारगाव परिसरात परराज्यातून बोअरवेल व्यावसायिक दाखल झाले आहेत. या भागात घोड, मीना नद्यांची पात्रे आहेत. परंतू नदीपात्रांपासून दूरच्या अंतरावर असणाऱ्या गावांमध्ये दरवर्षी उन्हाळ्यात तीव्र पाणीटंचाई निर्माण होते. त्याचा शेतातील पिकांना ताण बसतो. त्यामुळे उन्हाळ्याची तयारी म्हणून अनेक शेतकरी शेत जमिनीत बोअरवेल घेतात. सध्या बोअरवेल घेण्यास फुटामागे ७५ रुपये मोजावे लागत आहेत.

## पाणी टंचाईची चाहूल...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



रांजणी पारगाव (ता.आंबेगाव )परिसरात बोअरवेल व्यावसायिक दाखल झाले आहेत. (छाया : रोहीत खुडे).

# चारा टंचाईमुळे दूध उत्पादकांची कसरत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**रांजणी :** उन्हाळ्याची चाहूल आता चांगलीच लागली आहे. त्यामुळे आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात चारा टंचाईची समस्या शेतकऱ्यांपुढे उभे राहिली आहे. या परिसरात दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणावर शेतकरी करतात. परंतु आता दूध देणाऱ्या जनावरांना हिरवा चारा आतापासूनच खायला मिळत नाही. त्यामुळे हिरवा चारा जनावरांना खायला देण्यासाठी दूध उत्पादक शेतकऱ्यांची अक्षरक्षः कसरत सुरू झाली आहे.

तालुक्याच्या पूर्व भागात गेल्या दोन महिन्यांपासूनच चारा टंचाई निर्माण झाली आहे. परतीच्या पावसाचा फटका डोंगर माळरानावरील चाऱ्याला बसला. त्यामुळे चार टंचाई निर्माण झाली. तालुक्याच्या पूर्व भागातील प्रत्येक गावामध्ये शेतकरी शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुधाचा धंदा मोठ्या प्रमाणावर करतात. प्रत्येक शेतकऱ्याकडे दूध देणाऱ्या संकरित गाई आहेत. या गायींना हिरवा चारा मोठ्या प्रमाणावर लागतो. परंतू आता शेतकऱ्यांकडेच हिरवा चारा शिल्लक नाही.

शेतकरी जनावरांसाठी हिरवा चारा आणण्यासाठी धडपड करताना दिसत आहेत. या भागात सध्या ऊसतोड जोरात सुरू आहे. परंतू उसाचे हिरवेगार वाढे देखिल सहजासहजी मिळत नाहीत. चार-पाच किलोमीटर अंतरावर जाऊन शेतकरी जनावरांसाठी उसाचे वाढे खरेदी करण्यासाठी सायकल - मोटरसायकलवर जातात. उन्हाळ्याचे पुढील दिवस कठीण आहेत. परंतु आतापासूनच शेतकऱ्यांची कसरत सुरू झाल्याचे दिसून येत आहे.

### दिलीप वळसे पाटील यांची नाराजी व्यक्त

# लोक आपल्यापासून बाजूला का गेले

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**शिक्रापूर :** लोक आपल्यापासून बाजूला का गेले, करंदीला काय कमी केले आणि दोनशे मतांनी निवडून आल्यावर कोणत्या तोंडाने मंत्रिपद मागणार असे वक्तव्य करत विधानसभा निवडणुकीमध्ये मिळालेल्या कमी मताधिक्याबाबत माजी सहकार मंत्री व आमदार दिलीप वळसे पाटील यांनी नाराजी व्यक्त केली.

करंदी (ता. शिरूर) येथे विधानसभा निवडणुकी नंतर प्रथमच विकास कामांच्या भूमिपूजन कार्यक्रमसाठी माजी सहकारमंत्री व आमदार दिलीप वळसे पाटील आलेले असताना ते बोलत होते. याप्रसंगी म्हाडाचे अध्यक्ष माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, पंचायत समितीचे माजी सभापती सविता पऱ्हाड, प्रदीप वळसे पाटील, दुध संघाचे संचालक स्वप्नील ढमढेरे सुभाष उमाप, राष्ट्रवादी युवकचे अध्यक्ष अमोल जगताप, सरपंच शारदा ढोकले, उपसरपंच नितीन ढोकले, सोसायटीचे चेअरमन पोपट नप्ते, व्हाईस चेअरमन मोहन ढोकले, क्रांती युवा संघटनेचे अध्यक्ष विकास दरेकर, राघू नप्ते यांसह आदी उपस्थित होते.

राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये पडलेल्या फुटीनंतर गावातील काही पदाधिकारी शरद पवार गटात तर काही पदाधिकारी अजित पवार गटात विभागले गेले, त्यांनतर होणाऱ्या निवडणुकामध्ये करंदी गावासह जिल्हा परिषद गटातून यापूर्वी लोकसभा निवडणुकीमध्ये माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांना देखील कमी मताधिक्य मिळाले. डॉ. अमोल कोल्हे यांना ४०० मतांची आघाडी मिळाली, त्यानंतर स्वतः दिलीप वळसे पाटील यांना देखील कमी मताधिक्य मिळत विरोधी उमेदवार देवदत्त निकम यांना करंदी गावातून २०५ चे तर करंदी जिल्हा परिषद गटातून १७८० ची आघाडी मिळालेली असल्याने माजी सहकार मंत्री व आमदार दिलीप वळसे पाटील यांनी नाराजी व्यक्त केली.

# कॅलिडोस्कोप

## ३१ डिसेंबरपर्यंत आजारी रजा नाही



सोशल मीडियावर एक पोस्ट मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली. व्हायरल झालेल्या या पोस्टमध्ये कार्यालयाचे नियम स्पष्ट करण्यात आले. ३१ डिसेंबरपर्यंत कर्मचाऱ्यांना सुटी मिळणार नसल्याचेही सांगण्यात आले. कंपनीच्या या ऑर्डरची सोशल मीडियावर जोरदार चर्चा झाली. याशिवाय कर्मचाऱ्यांना आजारी रजाही मिळणार नाही, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. याचा सरळ अर्थ असा की, कर्मचारी आजारी असला तरी त्याला कार्यालयात यावे लागेल.

या आदेशाच्या प्रतीमध्ये २५ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबरपर्यंत कोणत्याही कर्मचाऱ्याला सुटी मिळणार नाही, असे लिहिले होते. याशिवाय कंपनीने आजारी रजेवर बंदी घातली आहे. यावर कंपनीचा युक्तिवाद असा आहे, की हा कालावधी सर्वात व्यस्त काळ आहे. भरपूर काम आहे, त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहणे खूप महत्वाचे आहे. त्यामुळे आम्ही सर्व प्रकारच्या सुट्ट्यांवर बंदी घातली आहे. या व्हायरल पोस्टमध्ये कंपनीचे नाव समोर आले नसले, तरी ही कंपनी आपल्या तुघलगी फर्मानामुळे सतत चर्चेत असते. नुकतेच पुण्यातील एका कंपनीत काम करणाऱ्या तरुणीचा मृत्यू झाला होता. त्याचे कारण विषारी कार्यसंस्कृती मानले जात होते. यानंतर बाजार नियामक 'सेबी'च्या कर्मचाऱ्यांनीही विषारी कार्यसंस्कृतीची तक्रार केली. अर्थ मंत्रालयाला लिहिलेल्या पत्रात असे म्हटले आहे, की 'सेबी'चे नेतृत्व विषारी कार्य संस्कृतीला प्रोत्साहन देत आहे.



## भिकाऱ्याने दिली पाच कोटींची मेजवानी!

पाकिस्तानातून एका मेजवानीत मिठाई, शेवया, बिर्याणी, पुलाव, कोरमा आणि काय काय नाही अशी धक्कादायक घटना समोर आली आहे. या मेजवानीला सुमारे २० हजार लोक उपस्थित होते. या घटनेतील आश्चर्यकारक बाब म्हणजे ज्या कुटुंबाने या मेजवानीचे आयोजन केले होते, ते कुटुंब व्यवसायाने भिकारी असून भीक मागून आपला उदरनिर्वाह चालवते. राजकीय आणि आर्थिक अस्थिरतेमुळे अनेकदा टीकेला सामोरे जाणाऱ्या पाकिस्तानलाही 'भिकारी देश' या लेबलचा फटका बसला आहे; मात्र एक अनोखी आणि धक्कादायक बाब म्हणजे देशातील व्यावसायिक भिकारीही प्रचंड संपत्तीचे मालक आहेत आणि कधी कधी समाजातील त्यांच्या 'भिकारी' या ओळखीच्या वर उठून लोकांना धक्का बसेल अशी कामे करतात. एका रिपोर्टनुसार, हा कार्यक्रम गुजरनवाला येथील राहवली रेल्वे स्टेशनजवळ झाला. पंजाबच्या विविध भागातून हजारो लोक यात सहभागी झाले होते. भिकारी कुटुंबाने या मेजवानीवर सुमारे पाच कोटी पाकिस्तानी रुपये खर्च केले, जे सुमारे १.२५ कोटी भारतीय रुपयांच्या समतुल्य आहे. ही बातमी पाकिस्तानातील एका कुटुंबाची आहे, जी भीक मागून जगते;पण आपल्या मेहनतीने आणि प्रामाणिकपणाने त्यांनी इतकी प्रगती केली, की त्यांनी त्यांच्या आजीच्या चाळीसाव्या (चाळीसाव्या दिवसाच्या प्रार्थनेच्या दिवशी) २०,००० लोकांना जेवण दिले. परिस्थिती कशीही असो, मेहनत आणि चांगल्या हेतूने कोणतेही ध्येय गाठता येते, हे या कुटुंबाने दाखवून दिले.

## एका केळीची किंमत ५२ कोटी!


केळी खाण्यासाठी जास्त पैसे खर्च करावे लागत नाहीत. बाजारात केळी ४० ते ७० रुपये डझनने विकली जात आहेत; पण एका सामान्य केळीची किंमत ५२ कोटी रुपये असू शकते? होय, न्यूयॉर्कमध्ये एका लिलावादरम्यान एक केळी ५२ कोटी रुपयांना विकली गेली!

भिंतीवर टेप केलेल्या केळीच्या वैचारिक कलाकृतीला न्यूयॉर्कच्या लिलावात तब्बल ६.२ दशलक्ष डॉलर्स मिळाले. त्यात प्रसिद्ध क्रिप्टोकरन्सी व्यावसायिकाकडून सर्वाधिक बोली लागली. 'कॉमेडियन' आणि इटालियन कलाकार Maurizio Cattelan यांनी तयार केलेल्या, केळीच्या या कलाकृतीने २०१९ मध्ये आर्ट बासेल मियामी बीचवर पदार्पण केले, तेव्हा जगाचे लक्ष वेधून घेतले. चांदीच्या डक्ट टेपसह पांढऱ्या भिंतीवर सुरक्षित केलेली एकटी पिवळी केळी ही एक युक्ती आहे की कलाविश्वाची खरी उत्कृष्ट नमुना आहे यावर पाहुणे वाद घालत राहिले. त्यामुळे भाव वाढले. बोली आठ लाख डॉलरपासून सुरू झाली; परंतु काही मिनिटांतच ती ४० लाख डॉलरपर्यंत गेली.

लिलावकर्ता ऑलिव्हर बार्कर म्हणाला, की खरेदीदार अतिरिक्त १ दशलक्ष डॉलर्स देईल. अंतिम हॅमरची किंमत ५.२ दशलक्ष डॉलर झाली, त्यानंतर एका व्यावसायिकाने ही केळी ५०२ दशलक्ष डॉलरमध्ये विकत घेतली.

असे असतानाही लिलावाचे पैसेही व्यापारी १० लाख रुपयांच्या खोलीत भरणार आहेत. त्यानुसार या केळीची किंमत ६.२ दशलक्ष रुपये आहे जी भारतीय बाजारपेठेत ५२ कोटी रुपयांच्या समतुल्य आहे. ही बातमी सोशल मीडियावर पसरताच लोकांमध्ये खळबळ उडाली आणि ५२ कोटी रुपये किमतीच्या केळीमध्ये विशेष काय आहे याची उत्सुकता निर्माण झाली. सोशल मीडिया यूजर्सनी केळी विकत घेतलेल्या व्यक्तीबद्दल ही व्यक्ती एकतर खूप श्रीमंत आहे किंवा तो वेडा झाला आहे, अशा प्रतिक्रिया नोंदवल्या.





## झेंगडू शहरात सात सूर्य!

चीनच्या चेंगडू शहराच्या आकाशात अचानक सात सूर्य दिसायला लागले! हे अप्रतिम दृश्य पाहून तुमचा तुमच्या डोळ्यांवर विश्वास बसणार नाही. अनेक वेळा निसर्ग असे काही दाखवतो, जे केवळ निसर्गाच्या नियमांमुळेच शक्य होते. महान योद्धे निसर्गाचे शोषण पाहून आश्चर्यचकित आणि अस्वस्थ होतात. अशीच एक घटना चीनमधून समोर आली आहे, जिथे आकाशात असे दृश्य दिसले, की कल्पना करणेही अशक्य होते. चीनच्या आकाशात एकाच वेळी सात सूर्य दिसले आणि पाहणारे लोकही थक्क झाले. हे प्रकरण चीनच्या चेंगडू शहराचे आहे, जिथे आकाशात एकाच वेळी सात सूर्य दिसले, ही विलक्षण आणि अविश्वसनीय घटना तिथे उपस्थित असलेल्या लोकांनी आपल्या कॅमेऱ्यात कैद केली. १८ ऑगस्ट रोजी काढलेला हा व्हिडीओ काही वेळातच सोशल मीडियावर व्हायरल झाला. हे विलक्षण दृश्य आकाशात सुमारे एक मिनिट दिसले. 'डिम सन डेली एचके'ने दिलेल्या वृत्तानुसार, चेंगडू येथील एका स्थानिक व्यक्तीने हा व्हिडीओ आपल्या कॅमेऱ्यात कैद केला आहे. या व्यक्तीने सांगितले, की आकाशात हे दृश्य पाहून सर्वजण आश्चर्यचकित झाले आणि लोकांचे पाय



जिथे होते तिथेच थांबले. ही घटना चीनमधील लोकांमध्ये चर्चेचा विषय बनली आहे. तज्ज्ञांचे असे मत आहे, की आकाशात सात सूर्य नाहीत किंवा ते कुठल्या जादूने आलेले नाहीत, उलट परावर्तनाचा परिणाम म्हणजे आकाशात असे दृश्य दिसले आहे. प्रकाशाच्या परावर्तनातील ऑप्टिकल भ्रमामुळे ही घटना घडली आहे. या घटनेचे मुख्य कारण म्हणजे प्रकाशाच्या अपवर्तनाची क्रिया आणि स्तरित काचेच्या परावर्तनामुळे होणारा सामान्य ऑप्टिकल भ्रम आहे.

## अन्नदानाचा विश्वविक्रम

तेलंगणाच्या गौतमकुमारने अनोखा विश्वविक्रम केला आहे. त्याने दिवसभरात एक हजारपेक्षा जास्त गरीबांना अन्नदान केलं. 'युनिव्हर्सल बुक ऑफ रेकॉर्डस'ने त्याच्या या कामगिरीची दखल घेतली आहे. या संस्थेतर्फे गौतमचा सन्मानही करण्यात आला. हैदराबादमध्ये रहाणाऱ्या गौतमकुमारची स्वत:ची एनजीओ आहे. या एनजीओच्या माध्यमातून तो सामाजिक कार्य करतो. २०१४ मध्ये त्याने ही एनजीओ सुरू केली. सर्व नीडी असं त्याच्या संस्थेचं नाव असून कोणालाही उपाशी झोपावं लागू नये, हा या संस्था स्थापनेमागचा उद्देश आहे. जास्तीतजास्त लोकांना अन्नदान करण्याचा संकल्प त्याने सोडला आहे. त्याच्या संस्थेचे १४० कार्यकर्ते यासाठी झटत असतात. गौतमकुमारने हैदराबादमधल्या तीन वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन गरजूंना भोजन दिलं. आधी तो गांधी हॉस्पिटलमध्ये गेला. तिथल्या गरीब रुग्णांना खायला दिलं. मग राजेंद्र नगरमध्ये जाऊन अन्नदान केलं आणि शेवटी अम्मा नन्ना अनाथालयात तो गेला. हा विक्रम केल्यानंतर 'युनिव्हर्सल बुक ऑफ रेकॉर्डस'ने त्याला प्रमाणपत्र दिलं.



## मिठाच्या खाणींमधला स्पा

बेलारूसमध्ये वैद्यकीय पर्यटनाचं प्रमाण बरंच जास्त आहे. इथे मिठाच्या खाणींचं रुपांतर स्पामध्ये करण्यात आलं आहे. हे अनोखे स्पा लोकांच्या आकर्षणाचं केंद्र ठरत आहेत. जमिनीपासून ४०० मीटर खोल हे स्पा आहेत. या स्पामध्ये उपचार करून घेण्यासाठी दरवर्षी काही हजार पर्यटक बेलारूसला येतात. बेलारूसमधल्या खाणी तसंच बोगद्यांमध्ये मीठ आणि पोटॅशियम मोठ्या प्रमाणावर आढळतं. याचा उपयोग विविध विकारांवरच्या उपचारांसाठी केला जातो. इथे येणाऱ्या लोकांना मन:शांती तर मिळतेच शिवाय अस्थमा, ॲलर्जी आणि श्वसनाचे विकारही दूर होतात. राजधानी मिन्स्कपासून १३० किलोमीटर अंतरावर १९९१ मध्ये पहिलं नॅशनल स्पीलिओथेरेपी क्लिनिक सुरू झालं. या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांमध्ये रशियन लोकांची संख्या अधिक असते. इथे टीव्ही, इंटरनेटसारख्या सोयी नाहीत पण विविध प्रकारचे व्यायाम करता येतात. काही काळ निवांतपणे घालवता येतो. मीठाच्या खाणींमधल्या स्पामध्ये २ ते ३ दिवस रहाता येतं. दोन आठवडे रहाण्यासाठी एक हजार डॉलर म्हणजे ७० हजार रुपये इतका खर्च आहे. एक वेगळा अनुभव म्हणून इथे जायला काहीच हरकत नाही.





## मधमाशा झाल्या गायब

जागतिक तापमान वाढ, कमी होत जाणारे अधिवास यामुळे प्राणी, पक्षी, किटक यांची संख्या कमी होत चालली आहे. प्राणी–पक्ष्यांच्या अनेक प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. याचा जीवसृष्टीवर विपरित परिणाम होऊ शकतो. इंग्लंडच्या पूर्व भागात मधमाश्यांच्या १७ प्रजाती नष्ट झाल्याचं अधिकृतरित्या जाहीर करण्यात आलं आहे. यात ग्रेट येलो बंबल बी आणि पॉटर फ्लॉवर बी सारख्या दुर्मिळ प्रजातीच्या मधमाश्यांचा समावेश आहे. वर्ल्ड वाईड फंड फॉर नेचर च्या अहवालात ही बाब नमूद करण्यात आली आहे. या घटनेकडे दुर्लक्ष करून चालण्यासारखं नाही. ही धोक्याची घंटा असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेत मधमाश्यांचं मोठं योगदान आहे. मधमाश्यांच्या कमी संख्येमुळे शेतकऱ्यांपासून ग्राहकांपर्यंत प्रत्येकाला त्रास होणार आहे. ब्रिटनमधल्या सफरचंदाच्या शेतीसाठी मधमाश्यांची गरज असते.

या मधमाश्या विविध माध्यमातून ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेत भारतीय चलनात सहा हजार कोटी रुपयांचं योगदान देत होत्या. मात्र आता इथली शेती, मधुमक्षिका पालन, फळांची लावगड यावर परिणाम होणार आहे. या प्रश्नाकडे गांभीर्याने बघण्याची गरज सर्वच स्तरातून व्यक्त होते आहे.

## वाजतच नाहीत बारा



बाराचा टोला पडला की चांगलीच धावपळ सुरू होते. मध्यान्ह सुरू झाल्याची ही वर्दी असते. रात्रीच्या बाराच्या टोल्याला सर्व जण झोपायची तयारी करू लागतात. घड्याळात नेमाने दोन वेळा बाराचे टोले पडतात. पण एखाद्या घड्याळ्यात बारा वाजतच नसतील तर? जगात असं एक घड्याळ आहे. स्वीत्झर्लंडच्या सोलोथर्न शहरात हे विचित्र घड्याळ आहे. या शहरातल्या टाउन स्क्वेअरमध्ये हे घड्याळ पहायला मिळतं. गंमत म्हणजे या घड्याळात फक्त ११ आकडे आहेत. १२ हा आकडाच नाही. १२ न वाजणारी बरीच घड्याळं इथे आहेत. यामागचं कारण मजेशीर आहे. इथल्या लोकांना ११ हा आकडा खूप आवडतो. त्यांच्यादृष्टीने हा आकडा शुभ मानला जातो. या शहरातल्या अनेक वस्तूंची रचना अकरा आकड्याप्रमाणे केल्याचंही पहायला मिळतं. या शहरातल्या चर्च आणि चॅपलची संख्या ११ आहे. इथलं सेंट उसूर्स हे प्रमुख चर्च ११ वर्षांत बांधून तयार झालं होतं. या चर्चला ११ दरवाजे आहेत तसंच ११ घंटा बांधण्यात आल्या आहेत. इथले लोक अकरावा वाढदिवस मोठ्या जल्लोषात साजरा करतात. याबाबतच्या काही आख्यायिका इथे प्रसिद्ध आहेत.

## वराशिवाय होतं लग्न

लग्नात वराला म्हणजे नवऱ्या मुलाला प्रचंड महत्त्व असतं. त्याची सरबराई केली जाते. प्रत्येक इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न होतो. वधू पक्षाकडचे तर वराच्या दिमतीला हजर असतात. वरातीत नवरा मुलगा घोड्यावर बसून मिरवत असतो. त्याच्या खाण्यापिण्याची पूर्ण व्यवस्था केलेली असते. मात्र आपल्या देशात लग्नाच्या विविध पद्धती असतात. प्रथा, परंपरा आणि विधी असतात. प्रत्येक जात, धर्मानुसार लग्नविधींमध्ये वैविध्य आढळतं. काही लग्नांमध्ये महिला वरातीत जात नाहीत. मात्र एका समाजातल्या लग्नात नवरा मुलगा वरातीत नसतो. राजस्थानातल्या छोटा उदयपूर भागातल्या आदिवासी समाजात अशी परंपरा आहे. लग्नात नवऱ्या मुलाऐवजी त्याची अविवाहित बहिण किंवा कुटुंबातली अविवाहित महिला सहभागी होते. नवरा मुलगा आईसोबत घरीच थांबतो. या प्रथेबद्दल ऐकून कोणालाही आश्चर्य वाटेल. वरातीत वराची बहिणच सहभागी होते. गंमत म्हणजे लग्नाचे सगळे विधी तिच पार पाडते. सप्तपदीचा विधीही ही बहिणच पार पाडते. इथल्या तीन गावांमध्ये अशी परंपरा आहे. ही प्रथा मोडली तर वाईट गोष्टी घडतील या भीतीने कोणीही ही पद्धत मोडायला धजावत नाही. नवऱ्याशिवाय संपन्न होणारं लग्न म्हणजे विचित्रच प्रकार म्हणायला हवा.




## एव्हरेस्टचे कलंदर

जगातलं सर्वात उंच एव्हरेस्ट शिखर सर करण्याची चढाओढ सध्या पहायला मिळते आहे. एव्हरेस्टच्या मार्गावर गिर्यारोहकांची मोठी गर्दी झाली आहे. इथे ट्रॅफिक जॅमसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. एव्हरेस्टची चढाई खूप कठीण असते. मात्र शेर्पा कामी रिता यांनी २४ वेळा हे शिखर सर केलं आहे. अशी कामगिरी करणारे ते जगातले पहिलेच व्यक्ती आहेत. वयाच्या बाराव्या वर्षापासून कामी रिता एव्हरेस्टच्या बेस कँपपर्यंत गिर्यारोहकांच्या गरजेचं सामान पोहोचवण्याचं काम करतात. जवळपास ११ वर्षं त्यांनी हे काम केलं.

१९९२ मध्ये त्यांना पहिल्यांदा एव्हरेस्ट चढण्याची संधी मिळाली. ही चढाई करण्याआधी त्यांनी एव्हरेस्टच्या वातावरणाची पूर्ण माहिती घेतली. १९९४ मध्ये कामी पहिल्यांदा एव्हरेस्टच्या कँप ४ पर्यंत म्हणजे २५,९३८ फूट उंचीवर पोहोचले. त्यानंतर त्यांनी नियमितपणे अशी चढाई सुरू केली. एका वर्षात दोन वेळाही ते एव्हरेस्ट चढले आहेत. शेरपा म्हणून जगातल्या सात खंडांमधल्या सात शिखरांवर चढण्याचा विक्रमही कामी रिता यांच्या नावे आहे. नेपाळमधल्या थेमू गावात कामी रिताचा जन्म झाला. वडिलांना एव्हरेस्ट चढण्याची खूप इच्छा होती. मात्र काही कारणांमुळे हे शक्य झालं नाााही.

आता कामी आपल्या वडिलांची ही इच्छा पूर्ण करत आहेत. कामीचे मोठे भाऊ लाकपा रिताही १७ वेळा एव्हरेस्ट चढले आहेत. आपण अजून तंदुरूस्त असून साठीपर्यंत एव्हरेस्ट सर करत रहाणार असल्याचं कामी रिता सांगतात. त्यांच्या या उत्साहाला सलाम केला पाहिजे.





“जर रोहित शर्माला चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी सूर गवसला तर आपल्याला वेगळ्या प्रकारचा कर्णधार पाहायला मिळेल. याशिवाय त्याचा दृष्टिकोनही वेगळा असेल.” रोहित शर्माला गेल्या १० डावांमध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २० धावांचा टप्पाही गाठता आलेला नाही. गेल्या २० डावांमध्येही त्याची सरासरी १० च्या आसपास राहिली आहे, जी त्याच्या आणि टीम इंडियासाठी चिंतेचा विषय आहे. रोहित शर्माने मायदेशात न्यूझीलंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत आणि नंतर बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये फ्लॉप झाल्यानंतर रणजी सामन्यात प्रवेश केला. तिथे तो पहिल्या डावात फ्लॉप झाला, तर दुसऱ्या डावात त्याने काही झटपट धावा केल्या. अशा परिस्थितीत पांढऱ्या चेंडूच्या क्रिकेटमध्ये पुनरागमन केल्यानंतर त्याचा फॉर्म परत येईल, असे बोलले जात होते, मात्र तसे झाले नाही.

— सुरेश रैना

# स्टीव्ह स्मिथचे सलग दुसरे शतक

## द्रविड, जो रूट यांच्या विक्रमाशी बरोबरी, विराट राहिलाय माघारी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** श्रीलंका विरुद्ध ऑस्ट्रेलिया संघात गुरुवारपासून (६ फेब्रुवारी) दुसरा कसोटी सामना सुरू झाला आहे. गॉल येथे होत असलेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा कर्णधार स्टीव्ह स्मिथने दमदार फलंदाजी करत या मालिकेतील सलग दुसरे शतक ठोकले आहे. यासोबतच त्याने काही मोठ्या विक्रमांनाही गवसणी घातली आहे. या सामन्यात श्रीलंकेचा संघ पहिल्या डावात २५७ धावांवर सर्वबाद झाल्यानंतर ऑस्ट्रेलिया संघ फलंदाजीला उतरला. ऑस्ट्रेलियाने ३७ धावात दोन विकेट्स गमावल्यानंतर स्मिथ फलंदाजीला उतरला. त्याने आधी उस्मान ख्वाजासह अर्धशतकी भागीदारी केली.

ख्वाजा ३६ धावांवर बाद झाल्यानंतर त्याला ॲलेक्स कॅरेने चांगली साथ दिली. या दोघांमध्ये दीडशे धावांनी भागीदारी झाली आहे. या भागीदारी दरम्यान स्मिथने १९१ चेंडूत शतकी खेळी पूर्ण केली.




हे त्याचे कसोटी क्रिकेटमधील ३६ वे कसोटी शतक आहे, तर कसोटी कर्णधार म्हणून १७ वे शतक आहे. याशिवाय आशिया खंडातील ७ वे शतक आहे. तसेच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील हे त्याचे ४८ वे शतक आहे.

सध्याच्या काळातील फॅब फोर म्हणून केन विलियम्सन, विराट कोहली, स्टीव्ह स्मिथ आणि जो रुट यांना ओळखले जाते. या चौघांमध्ये आता सर्वाधिक कसोटी शतके करणाऱ्या रुटच्या विक्रमाशीही स्मिथने बरोबरी केली आहे.

रुट आणि स्मिथ पाठोपाठ केन विलियम्सन असून त्याने ३३ कसोटी शतके केली आहेत. तसेच सर्वात शेवटी विराट कोहली असून त्याने ३० कसोटी शतके केली आहेत.

### द्रविडशी बरोबरी

- त्याने आता सर्वाधिक आंतरराष्ट्रीय शतके करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत ११ वे स्थान मिळवले आहे. त्याने रोहित शर्मा आणि राहुल द्रविड यांची बरोबरी केली आहे. या दोघांनीही आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये प्रत्येकी ४८ शतके केली आहेत. याशिवाय सर्वाधिक कसोटी शतके करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत आता स्मिथने इंग्लंडचा जो रुट आणि राहुल द्रविडची बरोबरी केली आहे. रुट आणि द्रविड या दोघांनीही कसोटीत आत्तापर्यंत प्रत्येकी ३६ कसोटी शतके केली आहेत.

### सर्वात जलद ३६ कसोटी शतके

- स्मिथ आता सर्वात जलद ३६ कसोटी शतके करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत दुसऱ्या क्रमांकावर आला आहे. स्मिथने २०६ डावात ३६ कसोटी शतके केली आहेत. या यादीत पहिल्या क्रमांकावर रिकी पॉंटिंग आहे.
- पॉंटिंगने २०० डावात ३६ कसोटी शतके केली आहेत. कुमार संगकारा या यादीत तिसऱ्या क्रमांकावर आहे, त्याने २१० डावात ३६ कसोटी शतके केली होती, तर सचिन तेंडुलकरने २१८ डावात ३६ कसोटी शतके केली होती.

## हार्दिक पंड्याची कर्णधारपदी पुन्हा लागणार वर्णी?

**नवी दिल्ली :** भारतीय अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्याला टी-२० संघाच्या कर्णधारपदावरून काढून टाकणे अत्यंत दुर्दैवी मानले जात आहे. कारण त्याने २०२२ ते २०२४ दरम्यान अनेक वेळा संघाचे नेतृत्व केले होते. बीसीसीआय निवड समितीने २०२४ च्या टी-२० विश्वचषक जेतेपदानंतर निवृत्त होणाऱ्या रोहित शर्माच्या जागी सूर्यकुमार यादवला कर्णधार बनवण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, एका रिपोर्टनुसार, सूर्यकुमार आणि रोहितच्या खराब कामगिरीमुळे हार्दिकचे कर्णधारपदी पुनरागमन होऊ शकते. सूर्यकुमार यादवने एकेकाळी आयसीसी टी-२० फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थान पटकावले होते, परंतु जेव्हापासून त्याच्याकडे भारतीय संघाचे कर्णधारपद सोपवण्यात आले तेव्हापासून त्याचा फॉर्म घसरत गेला.

भारतीय क्रिकेट संघाचा अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्या पुन्हा एकदा मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये कर्णधारपदावर परत येऊ शकतो. दैनिक जागरणच्या अहवालानुसार, नेतृत्वाच्या भूमिकेत त्याचे पुनरागमन आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मधील संघाच्या कामगिरीवर अवलंबून असेल.

## पुना क्लब प्रीमियर क्रिकेट लीग २०२५ स्पर्धा १० फेब्रुवारीपासून

**पुणे :** पुना क्लब लिमिटेडच्या वतीने अकराव्या पुना क्लब प्रीमियर लीग क्रिकेट २०२५ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दि.१० ते १५ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत पुना क्लब क्रिकेट मैदानावर होणार



आहे. पत्रकार परिषदेत अधिक माहिती देताना पुना क्लबचे अध्यक्ष श्री गौरव गढोक यांनी सांगितले की, स्पर्धेतील खेळाडूंची निवड लिलाव पद्धतीने करण्यात आली असून संघांचे मालक हे क्लबचे सदस्य आहेत. पुना क्लबचे उपाध्यक्ष इंद्रनील मुजगुले यांनी सांगितले की, यंदाच्या वर्षी १० संघांनी आपला सहभाग नोंदवला आहे. तसेच,विशेषतः १६ वर्षाखालील सर्व गटातील २५ उदयोन्मुख खेळाडूंना पुना क्लब लिमिटेडच्या वतीने वार्षिक शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. विविध क्रिडाप्रकारांना वेळोवेळी प्रोत्साहन देण्यासाठी पुना क्लब नेहमीच आघाडीवर असतो. या स्पर्धेला जेट सिंथेसिस व ग्रॅव्हीटास फाउंडेशन यांचे मुख्य प्रायोजकत्व लाभले आहे. एलिका यांचे सहप्रायोजकत्व लाभले आहेत. लिलावात रौनक ढोले पाटील(फोर ओक्स सेलर्स, ६३०० पॉईंट्स), भार्गव पाठक(मनप्रीत अँड जीजीज जॅग्वार्स, ६२०० पॉईंट्स) हे सर्वात महागडे खेळाडू ठरले आहेत. स्पर्धेत मनप्रीत अँड जीजीज जॅग्वार्स(मनप्रीत उप्पल व गौरव गढोक),जेट्स(राकेश नवानी), व्हीके टायगर्स(विक्रम काकडे),हिलयॉस इगल्स(सलील भार्गवा),ओबेरॉय अँड निल किंग्ज(वीरेंदर सिंग ओबेरॉय व इंद्रनील मुजगुले), व्हीएनएन क्वालिटी वॉरियर्स(आरव विज, रिद्दी शेवानी, अली तलब), पृथ्वी लायन्स(अमर सेंभे), जीएम टायफून्स(पवन कटारिया व क्रिश शहा), फोर ओक्स सेलर्स(सुमीरन मेहता), परमार ३६० एचएमएस ऑल स्टार्स(हिरेन परमार व कपिल ढोले पाटील) हे १० संघ सहभागी झुंजणार आहेत.

## मेस्सीच्या मुलाचे एकाच सामन्यात तब्बल ११ गोल

**नवी दिल्ली :** लिओनेल मेस्सीची गणना जगातील महान फुटबॉलपटूंमध्ये केली जाते. लिओनेल मेस्सीने आपले नाव जगभर प्रसिद्ध केले आहे.



मेस्सीने आपल्या शानदार खेळाच्या जोरावर जगभरात लाखो चाहते बनवले आहेत. २०२२ मध्ये अर्जेंटिनाला फुटबॉल विश्वचषक जिंकून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारा मेस्सीचा मुलगा थियागो मेस्सीही आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल टाकत आहे. थियागो केवळ १२ वर्षांचा आहे, मात्र या लहान वयात त्याने एकाच सामन्यात ११ गोल करून सर्वांनाच चकित केले आहे. थियागोने एकाच सामन्यात एकापाठोपाठ एक असे ११ गोल करत लोकांना वेड लावले आहे. लिओनेलने आपल्या खेळाने फुटबॉल विश्वात एक वेगळी ओळख निर्माण केली असून आता त्याचा मुलगा थियागोही त्याच्या मार्गावर चालला आहे. थियागोने फुटबॉलच्या दिशेने पावले टाकली असून याचे उत्तम उदाहरण नुकतेच दाखवून दिले आहे. अंडर-१३ एमएलएस चषकाच्या एका सामन्यात त्याने एकामागून एक ११ गोल केले. थियागोने सामन्याच्या पूर्वार्धात ५ गोल केले. यानंतर दुसऱ्या हाफमध्ये त्याने दुहेरी हॅट्ट्रिक केली. अशाप्रकारे, त्याने अंडर-१३ एमएलएस चषक स्पर्धेत अटलांटा युनायटेड विरुद्ध त्याच्या संघ इंटर मियामीसाठी जोरदार गोल केले. थियागोने पहिल्या हाफच्या १२व्या, २७व्या, ३०व्या, ३५व्या आणि ४४व्या मिनिटाला गोल केले. यानंतर ५१व्या, ५७व्या, ६७व्या, ७६व्या, ८७व्या आणि ८९व्या मिनिटालाही गोल करण्यात आले. अंडर-१३ एलएलएस स्पर्धेत, मेस्सीच्या मुलाची जादू अशी होती की त्याने एकट्याने आपल्या संघाला विजयापर्यंत नेले.

## शुभमन म्हणाला- पुल माझा आवडता शॉट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** ३ सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताने इंग्लंडचा ४ विकेट्सने पराभव केला. प्रथम फलंदाजी करणारा इंग्लिश संघ २४८ धावांवर ऑलआउट झाला. शुभमन गिल आणि अक्षर पटेल यांच्या भागीदारीमुळे भारताने २५१ धावा करून सामना जिंकला.

"मी एकदिवसीय क्रिकेटसाठी खूप मेहनत घेतली आहे," असे पदार्पण करणारा हर्षित राणा गुरुवारी सामन्यानंतर म्हणाला. सामनावीर गिल म्हणाला, 'मी मारलेला पुल शॉट माझा आवडता होता.' अक्षर म्हणाला, 'मला माहित होते की मी मधल्या फळीत फलंदाजी करेन.' पदार्पणात ३ विकेट्स घेणारा हर्षित म्हणाला, 'भारतासाठी खेळणे हे स्वप्न होते. मी त्यासाठी स्वतःला तयार केले आणि कठोर परिश्रम केले. सुरुवातीला मी योग्य लांबीने गोलंदाजी केली नाही, पण ती दुरुस्त करताच मला त्याचे बक्षीस मिळाले.

# महिला व पुरुष राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेस आज प्रारंभ !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क


**पुणे :** हिंदू गर्जना प्रतिष्ठान आणि पुनित बालन ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘हिंदू गर्जना चषक’ महिला व पुरूष राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेस आज प्रारंभ झाला. स्पर्धेत पुण्यासह पिंपरी, चिंचवड, बारामती, मावळ, हवेली, शिरूर, मुळशी, इंदापुर, दौंड, पुरंदर, भोर, वेल्हे या वेगवेगळ्या जिल्ह्यातून कुस्तीपटू सहभागी झाले आहे.

शिक्षण प्रसारक मंडळी यांच्या सहकार्याने आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ आणि पुणे जिल्हा कुस्तीगीर संघ यांच्या या मान्यतेने घेण्यात आलेल्या या स्पर्धेत स्पर्धेत १४ वर्षाखालील कुमार गटामध्ये २७४ खेळाडू, १७ वर्षाखालील गटामध्ये १९९, वरिष्ठ गटामध्ये १९८, महिला गटात ६०, कुमार खुला गटामध्ये ३५, वरिष्ठ खुल्या गटामध्ये ७६ आणि महिला खुल्या गटामध्ये २७ खेळाडूंनी सहभाग नोंदविला आहे.

टिळक रोड येथील स.प. महाविद्यालयाच्या मैदानावर आज सकाळच्या सत्रामध्ये स्पर्धेत १४ वर्षाखालील कुमार गटाच्या लढती घेण्यात आल्या. मध्यभागी कुस्तीचे आखाडे आणि प्रेक्षक गॅलरी असे भव्य कुस्ती स्टेडियमची निर्मिती या स्पर्धेसाठी केली गेली आहे. मैदानावर मातीचे दोन स्वतंत्र आखाडे तयार करण्यात आले असून आखाड्यांच्या बाजुने क्रीडारसिकांची १० हजार प्रेक्षकांची बसण्याची सोय केली आहे. तसेच वाहनांच्या पार्किंगसाठी व्यवस्थाही करण्यात आली आहे. स्पर्धेसाठी येणाऱ्या पुरूष आणि महिला पैलवानांसाठी राहण्याची आणि भोजनाची सोय करण्यात आल्याचे पुनीत बालन ग्रुपचे अध्यक्ष पुनीत बालन आणि हिंदू गर्जना प्रतिष्ठानचे अध्यक्ष धीरज रामचंद्र घाटे यांनी सांगितले.

संध्याकाळच्या सत्रामध्ये (संध्याकाळी ६ वाजता) स्पर्धेचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते होणार असून यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील आणि क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्ता मामा भरणे हे उपस्थित राहणार आहेत.





१४ वर्षाखालील कुमार गटाच्या लढतीमधील रोमहर्षक क्षण.

## कन्कशन वादावर बोलताना राणाने टीकाकारांना दिले प्रत्युत्तर



**नागपुर :** भारत आणि इंग्लंड यांच्यात खेळल्या जात असलेल्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील पहिल्या सामन्यात, वेगवान गोलंदाज हर्षित राणालाही टीम इंडियाच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान मिळाले, ज्यामध्ये त्याने आपल्या पदार्पणाच्या एकदिवसीय सामन्यात चमकदार कामगिरी केली आणि एकूण तीन विकेट घेतल्या. हर्षित राणासाठी गेले काही महिने चांगले गेले आहेत, ज्यात त्याला टीम इंडियासाठी तिन्ही फॉरमॅटमध्ये पदार्पण करण्याची संधी मिळाली आहे. यातील सर्वात खास पदार्पण टी-२० मध्ये होते, ते म्हणजे कन्कशन सबस्टीट्यूट जे आजपर्यंत चर्चेत आहे. आता त्यावर हर्षितने प्रतिक्रिया दिली आहे. हर्षित राणाचे कन्कशन सबस्टीट्यूट चाहत्यांमध्ये आणि क्रिकेट तज्ज्ञांमध्ये चर्चेचा विषय बनले आहे. इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेपूर्वी खेळल्या गेलेल्या टी-२० मालिकेतील चौथ्या सामन्यात हर्षितचा संघात अचानक बदल म्हणून संघात समावेश करण्यात आला, ज्यामध्ये तो शिवम दुबेच्या जागी आला. अनेक माजी खेळाडूंनीही या बदलावर टीका केली होती, त्यावर आता हर्षित राणाचे वक्तव्य समोर आले आहे. हर्षित राणाने इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, “लोक नेहमीच बोलत राहतील. मी अशा समस्यांकडे अजिबात लक्ष देत नाही. माझे काम मैदानावर चांगले खेळणे आहे. जेणेकरून मी संघाच्या विजयात योगदान देऊ शकेन. मला फक्त माझ्या देशासाठी चांगली कामगिरी करायची आहे आणि बाहेर काय चालले आहे याकडे मी लक्ष देत नाही.”

## स्प्रिंट सायकलिंगमध्ये महाराष्ट्राची सुवर्ण भरारी; मयुरी, शशिकला, अदिती व श्वेताची अव्वल कामगिरी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रामहाराष्ट्राने सायकलिंगमधील पदकांची मालिका कायम राखत 38व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सांघिक सुवर्ण यशाला गवसणी घातली. सांघिक महिला स्प्रिंट प्रकारात मयुरी लुटे, शशिकला आगाशे अदिती डोंगरे व श्वेता गुंजाळ यांनी सुवर्ण भरारी घेतली.

डोंगरदऱ्यातील रुद्रपूरमधील सायकलिंग ट्रॅकवर सांघिक स्प्रिंट प्रकारात एक मिनिट 15.690 सेकंदात शर्यत पूर्ण करून महाराष्ट्राच्या महिलांनी बाजी मारली. गतवेळच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतही महाराष्ट्राने याच क्रीडा प्रकारात सुवर्णपदक जिंकले होते. मयुरी, शशिकला, अदिती व श्वेता यांनी सायकलिंग मधील अप्रतिम कौशल्याचा प्रत्यय घडवित सुवर्णपदक जिंकले. सुरुवातीपासूनच महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सुरेख समन्वय दाखविताना वेगातही सातत्य दाखविले होते. त्यामुळेच महाराष्ट्राला या शर्यतीमधील आपले वर्चस्व राखता आले. या शर्यतीमध्ये अंदमान व निकोबार संघाने रौप्यपदक, तर ओडिशा संघाने कांस्यपदक मिळविले.




महाराष्ट्राच्या यशाबाबत प्रशिक्षिका दीपाली पाटील यांनी सांगितले की शर्यतीमध्ये सुवर्णपदक राखण्याचा आम्हाला विश्वास होता आणि आम्ही त्या दृष्टीनेच नियोजन केले होते. सराव शिबिरातही आम्ही ते ध्येय डोळ्यासमोर ठेवीत सराव केला होता. त्यामुळेच आम्हाला येथे नेत्र दीपक यश मिळवता आले. आमच्या यशाचे श्रेय आमच्या सर्व प्रशिक्षक व सहकारी स्टाफला द्यावे लागेल तसेच प्रताप जाधव यांनी दिलेल्या सहकार्यामुळेच आम्हाला हे यश मिळविता आले.

### भारतीय टेनिकाईट महासंघ

## माजी आमदार मोहन जोशी यांची 'चीफ पेट्रॉन'पदी निवड

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारतीय टेनिकाईट महासंघाच्या 'चीफ पेट्रॉन'पदी माजी आमदार मोहन जोशी यांची निवड करण्यात आली आहे. महासंघाची वार्षिक सभा नुकतीच झाली. या सभेत एकमताने मोहन जोशी यांच्या निवडीचा निर्णय घेण्यात आला.

टेनिकाईट(रिंग टेनिस) या क्रीडा प्रकाराला उत्तेजन देण्यासाठी तुम्ही निष्ठेने प्रयत्न करीत आहात. तुमचे मार्गदर्शन आणि पाठिंब्याने टेनिकाईट च्या खेळाडूंना प्रोत्साहन मिळेल, अशा शब्दांत मोहन जोशी यांचा महासंघाने गौरव केला आहे. भारतीय टेनिकाईट महासंघाचे अध्यक्ष राजीव शर्मा आणि सेक्रेटरी जनरल एम.आर.दिनेशकुमार यांनी नियुक्तीचे पत्र मोहन जोशी यांना दिले आहे. टेनिकाईट क्रीडा प्रकारांच्या राष्ट्रीय आणि राज्य स्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात मोहन जोशी यांचा पुढाकार राहिला आहे. टेनिकाईट (रिंग टेनिस) महाराष्ट्र संघटनेचे मोहन जोशी अध्यक्ष आहेत. हा खेळ अधिक लोकप्रिय व्हावा यासाठी विविध स्पर्धा आयोजित करून खेळाडूंच्या कौशल्याला अधिक वाव देण्याचा प्रयत्न करू, असे मोहन जोशी यांनी निवडीनंतर प्रतिक्रिया देताना सांगितले.

## मुलांच्या आंतरक्लब क्रिकेट स्पर्धेचे १० फेब्रुवारीपासून आयोजन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ट्वेन्टीफोर स्पोटर्स मॅनेजमेंट तर्फे ‘रायझिंग स्टार करंडक’ १० वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब क्रिकेट स्पर्धेचे १० फेब्रुवारी २०२५ पासून आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा १० ते १७ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत सिंहगड रोड येथील कोद्रे फार्म्स क्रिकेट मैदानावर होणार आहे.

या स्पर्धेबाबत अधिक माहिती देताना स्पर्धेचे संचालक आणि ट्वेन्टीफोर स्पोटर्चे संचालक उदय म्हात्रे यांनी सांगितले की, क्रिकेटचे प्रशिक्षण घेणाऱ्या पुण्यातील वेगवेगळ्या क्लब, ॲकॅडमी यामधील १० वर्षाखालील मुलांसाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. लहान



वयात मुलांना व्यावसायिक आणि स्पर्धात्मक खेळाचा सराव व्हावा, या उद्देशाने ही ‘रायझिंग स्टार करंडक’ स्पर्धा घेण्यात येत आहे. १५-१५ षटकांचे सामने खेळविण्यात येणार असल्याने एक वेगळा अनुभव मुलांना मिळणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. साखळी आणि बाद फेरीमध्ये होणाऱ्या या स्पर्धेत पुणे आणि परिसरातील असे एकूण १० संघ सहभागी झाले आहेत.

स्पर्धेत आयोजक कोद्रे फार्म्स ॲकॅडमी, योगेश क्रिकेट ॲकॅडमी, एके स्पोटर्स ॲकॅडमी, विजय क्रिकेट ॲकॅडमी, पीआर शिवराय ॲकॅडमी, सीएसआर स्पोटर्स, एमबीबी ॲकॅडमी, क्षेत्रम क्रिकेट ॲकॅडमी, व्हिडीआर ॲकॅडमी आणि पुणे स्टार क्लब क्रिकेट ॲकॅडमी हे संघ विजेतेपदासाठी झुंझणार आहेत. स्पर्धेमध्ये दोन गट कर ण्यात आले असून अ गटामध्ये कोद्रे फार्म्स ॲकॅडमी, योगेश क्रिकेट ॲकॅडमी, एके स्पोटर्स ॲकॅडमी, विजय क्रिकेट ॲकॅडमी, पीआर शिवराय ॲकॅडमी या संघांचा तर, ब गटामध्ये सीएसआर स्पोटर्स, एमबीबी ॲकॅडमी, क्षेत्रम क्रिकेट ॲकॅडमी, व्हिडीआर ॲकॅडमी आणि पुणे स्टार क्लब क्रिकेट ॲकॅडमी या संघांचा समावेश आहे.

### वाद संपवण्यासाठी चंद्रहार पाटील यांचा पुढाकार

## पृथ्वीराज मोहोळ-शिवराज राक्षे यांच्यात सांगलीत लढत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर येथे नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत पंचांच्या चुकीच्या निकालामुळे निर्माण झालेला वाद आता सांगलीच्या मातीत संपवण्याचा निर्धार डबल महाराष्ट्र केसरी पै. चंद्रहार पाटील यांनी केला आहे. यंदाचा महाराष्ट्र केसरी पै. पृथ्वीराज मोहोळ आणि वादाच्या केंद्रस्थानी असलेला मल्ल डबल महाराष्ट्र केसरी पै. शिवराज राक्षे यांच्यात सांगलीच्या आखाड्यात लढत निश्चित करण्यात आली आहे. या लढतीला दोन्ही मल्लांनी



हिरवा कंदील दाखवला आहे. महाराष्ट्र केसरीच्या आखाड्यातील वाद सांगलीत संपेल, असा विश्वास चंद्रहार यांनी व्यक्त केला आहे.

चंद्रहार पाटील म्हणाले, ‘सांगलीतील तरुण भारत क्रीडांगणावर हे मल्लयुद्ध होईल. त्यादृष्टीने आम्ही तयारीला सुरुवात केली आहे. शिवराज लढायला तयार होताच, आज पृथ्वीराज मोहोळ यानेही होकार दिला आहे.

कुस्ती शौकिनांच्या मनात महाराष्ट्र केसरी आखाड्यात चुकीच्या निकालानंतर निर्माण झालेल्या वादातून जी सल आहे, ती दूर होईल. शौकिनांना एक चांगली कुस्ती पाहायला मिळेल आणि वाद बाजूला ठेवून मल्ल नेहमी पुढे जात असतात, हा संदेश महाराष्ट्रभर जाईल. एका पंचाच्या पाच सेकंदाच्या चुकीच्या निकालाने शिवराज राक्षे यांच्या करिअरला मोठा धक्का बसला आहे. मात्र, या घटनेने महाराष्ट्रातील कुस्ती बदनाम होऊ नये, याची काळजी घेणे आम्हा सर्वांची जबाबदारी आहे. त्यासाठी हे मल्लयुद्ध आवश्यक होते. दोन्ही मल्लांनी अत्यंत सकारात्मक विचाराने या कुस्तीसाठी होकार दिला आहे. त्यांना प्रत्येकी २५ लाख रुपयांचे मानधन आम्ही देणार आहोत. वाद या दोन मल्लांचा नव्हता आणि नसेल. दोघांनीही कुस्तीची सेवा केली आहे, पुढेही करणार आहेत. त्यांच्यातील या लढतीमुळे त्यांच्या मनावरील दडपणही दूर होईल, तसेच सध्या निर्माण झालेले मतभेद, मनभेद दूर होतील.